# रामायणानंतरचें भारत.

हा निबंध

महादेव गोविंद अभ्यंकर

यानीं

आर्यभूषण छापखान्यांत छापून

प्रसिद्ध केला.

ता० १ जानेवारी १९०१.

किंमत आठ आणे.

# उपोद्घात.

मंदः कवियशःप्रार्थी गमिष्याम्युपहास्यतां ॥

कालिदास.

परमेश्वरकृपेनें वडिलांनीं उदरानिर्वाहाची व्यवस्था करून ठेवल्यामुळें करमणुकीकरितां मी भारत व रामायण हे ग्रंथ वाचीत असतों, व वाचतांना ज्या महत्वाच्या गोष्टी वाटतील त्यांचें टांचण करतों. या टांचणांचा कधीं उपयोग होईल असें मला स्वप्न पडलें नव्हतें; पण १८९८ सालीं येथील वसंतोत्सव व्याख्यानमालेचे चिटणीसांनीं भारतावरील माझा निबंध वाचण्याची परवानगी दिली व तो निबंध रा. कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर B. A. यांनीं केसरींत प्रसिद्ध करून मला उत्तेजन दिलें, ह्मणून मला तशा प्रकारचे दुसरे निबंध लिहिण्याचें धैर्य आलें. यांपैकीं मीं बरेच निबंध केसरी व मराठा या पत्रांतून प्रसिद्ध केले आहेत; परंतु 'वर्तमानपत्रांतून आलेल्या लेखांचा लोकांचे मनावर व्हावा तसा परिणाम होत नाहीं, व शिवाय ते लेखही चिरस्थायी होत नाहींत, ह्मणून तुह्मीं आपले निबंध मासिकपुस्त-

कांतून प्रसिद्ध करीत जा ' असें कांहीं मित्रांनीं मला सांगितलें. या त्यांच्या ह्मणण्यांत बराच अर्थ आहे असें वाटून सध्याचा निबंध संक्षिप्त रूपानें मी विविधज्ञानविस्तारकर्त्यांकडे पाठविला व त्यांनीं तो गेल्या सालच्या पहिल्या चार अंकांत प्रसिद्ध केला. वर्तमानपत्रें किंवा मासिकपुस्तकें यांत लेख लिहिणारांस नेहमीं एक अडचण येत असते, ती ही कीं आपले विचार समग्र छापवावयाचे झाले तर त्यांत इतकी जागा शिल्लक नसते, व संक्षिप्त रूपानें छापणें झालें तरी आपले सर्व मुद्दे एका खेपेस प्रसिद्ध होत नसल्यामुळें विषयाचें स्वारस्य नष्ट होतें. यास आपले विचार स्वतंत्र रूपानें छापून काढणें हाच एक उपाय आहे; परंतु आपले लोक अशिक्षित व गरीब असल्यामुळें तो निव्वळ बुडित खर्चाचा आहे. असो. माझा हा निबंध पुष्कळ विद्वानांस पसंत पडला व तो पुस्तकरूपानें छापून काढण्याचा मला कांहीं स्नेह्यांनीं आग्रह केल्यामुळें मीं तो समग्र छापून काढला आहे व तो मूळच्याहून चौपट मोठा झाला आहे. यामध्यें भारतांतील सुमारें दीड हजार श्लोक घालावयाचे होते, व एका ओळींत एका चरणापेक्षां अधिक मजकूर येऊं नये अशी माझी इच्छा होती ह्म-

णून कमी खर्चाचा असा हा पुस्तकाचा आकार धरावा लागला. यापेक्षां दुसरे आकार अधिक सुबक दिसले असते, परंतु त्यास सध्याच्या दुप्पट खर्च आला असता. ‘ हिंदुलोकांत अद्यापि संस्कृत ग्रंथाबद्दल प्रेम उत्पन्न झालें नाहीं म्हणून तुमचा निबंध इंग्रजींत छापून पाश्चात्य पंडितांकडे पाठवा म्हणजे तुमच्या श्रमाचें सार्थक होईल’ अशीही कांहीं मित्रांनीं मला सूचना केली होती, परंतु माझा निबंध इंग्रजींत प्रसिद्ध करून विलायतेस पाठविण्याच्या योग्यतेचा नाहीं असें मला वाटल्यामुळें मी त्यांच्या या सूचनेकडे दुर्लक्ष केलें. श्लोकांचा अर्थ संधि केल्यानें बरेच ठिकाणीं दुर्बोध होतो असा माझा अनुभव आहे; सबब छंदोभंग होऊं न देतां संधी तोडून श्लोक छापण्याची नवीन तऱ्हा या पुस्तकांत मीं अंगिकारली आहे, त्यामुळें वाचतांना पुष्कळ वाचक अडखळतील, व या विचित्र पद्धतीबद्दल कदाचित् मला दोषही देतील. ‘ एखाद्या विषयाचीं सर्व पुस्तकें वाचल्याशिवाय वर्तमानपत्रांतून व मासिकपुस्तकांतून मी लेख प्रसिद्ध करीत सुटतो व यांत लोकांपुढें नाचून प्रसिद्धी मिळविण्यापलीकडे माझा दुसरा हेतू नसतो’ असाही माझेवर कांहींचा आक्षेप आहे, पण

त्यास नाईलाज आहे. आपलीं मतें लोकांपुढें मांडल्याशिवाय आपल्या चुका कळण्यास दुसरा मार्ग नाहीं ह्मणूनच असले लेख मी छापीत असतों.

केसरीकर्ते, मराठाकर्ते व विविधज्ञानविस्तारकार यांनीं आजपर्यंत मला उदार आश्रय दिला याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे; तसेंच नामदार टिळक व डाक्तर भांडारकर यांनीं आपला अमूल्य वेळ मोडून माझ्या चुका दाखवून त्या सुधारण्याचे मार्ग दाखविले याबद्दल मी त्यांचाही आभारी आहें. रा. हरि नारायण आपटे वगैरे ज्या गृहस्थांनीं मला पुस्तकांची मदत केली त्यांचेही मजवर पुष्कळ उपकार आहेत. सरतेशेवटीं आपल्या काव्यांनीं आर्यांवर अगणित उपकार करून ठेवणाऱ्या व्यासवाल्मीकींच्या ऋणांतून असेच निबंध प्रसिद्ध करून थोडें तरी उत्तीर्ण होण्याची संधी परमेश्वरानें मला द्यावी अशी आशा प्रगट करून मी वाचकांची रजा घेतों.

**म. गो. अभ्यंकर.**

# अभिप्राय.

**डाक्तर रामकृष्ण गोपाळ भांडारकर** M. A. PH. D. C. I. E. हे लिहितातः—

रा. म. गो. अभ्यंकर यांचा निबंध मीं वाचून पाहिला. रामायणाचे अगोदरचे भारत आहे असें जें कांहीं पाश्चात्य पंडितांचें मत आहे तें चुकीचें आहे असें रा. अभ्यंकर यांनीं या निबंधांत सिद्ध केलें आहे. रामायण व महाभारत हे ग्रंथ रा. अभ्यंकर यांस चांगले अवगत असून त्यांचे निबंधांतील विचारसरणी निर्दोष आहे.

कै. प्रो. **दि. त्रिं. चांदोरकर** M. A. हे कळवितातः—

रा. म. गो. अभ्यंकर यांचा निबंध मीं वाचून पाहिला, त्यावरून निबंधकारांनीं या विषयाचें बरेंच परिशीलन केलें आहे असें दिसून येतें. त्यांत त्यांनीं आपलें मत सिद्ध करण्याकरितां जीं प्रमाणें दिलीं आहेत तीं माझ्या मतें युक्तिसिद्ध आहेत. शेवटीं त्यांनीं भारतांत आलेल्या वाल्मीकीच्या श्लोकांचा जो उतारा दिला आहे त्यावरून भारतापूर्वीं रामायण झालें याविषयीं कोणाच्याही मनांत संशय राहणार नाहीं.

न्या. **म. गो. रानडे** M. A. LL. B. C. I. E. हे लिहितातः—

रामायणानंतरचें भारत हा निबंध वाचून पाहिला. आपले मताप्रमाणेंच माझें मत आहे.

रा. रा. **नरसिंह चिंतामण केळकर** B. A. LL. B., एडिटर मराठा, हे लिहितात—

'भारतापूर्वीचें रामायण आहे' असें जरी वेबरप्रभृती कांहीं पाश्चात्य पंडितांचे मत होतें, तरी हेंच ह्मणणें निर्विवाद् सिद्ध करून त्याविरुद्ध सर्व आक्षेपांचें निरसन करण्याचें श्रेय रा. अभ्यंकर यांसच आहे. रामायण व भारतकालच्या सामाजिक स्थितीची तुलना, भारतकारानीं वाल्मीकीचे घेतलेले उतारे वगैरे रा. अभ्यंकर यांचीं प्रमाणें पाहिलीं असतां आमचे ह्मणण्याची सत्यता प्रत्येकाचे लक्षांत येईल.

न्या. **चिं. वि. वैद्य** M. A. LL. B. हे कळवितातः-

आपले लेख मीं वाचले. एकंदरींत आपण दोन्ही ग्रंथांचें चांगलें अवलोकन केलें आहे असें दिसतें. महाभारतानंतर रामायण लिहिलें आहे असें पाश्चात्य पंडित ह्मणतात तें मला पसंत नाहीं. आपण जीं वाक्यें वगैरे दिलीं आहेत तीं फार शोधपूर्वक काढिलीं आहेत

# रामायणानंतरचें भारत.

य: पृथ्वीभरवारणाय दिविजैः संप्रार्थितश्चिन्मयः ।
संजातः पृथ्वीतले रघुकुले मायामनुष्योऽव्ययः ॥
निश्चक्रं हतराक्षसः पुनरगात् ब्रह्मत्वमाद्यं स्थिरां ।
कीर्तिं पापहरां विधाय जगतः तं जानकीशं भजे ॥

## प्रस्तावना.

हा विषय हातीं घेण्याचें काय प्रयोजन आहे, असा पुष्कळ लोक साहजिक प्रश्न करतील. कारण रामावतारानंतर कृष्णावतार झाला, व रामायण रचणारा वाल्मीकि रामाचा समकालीन असून भारताचा कर्ता व्यास कृष्णाचा समकालीन होता; ह्मणून रामायण भारताचे पूर्वींचें आहे असें बहुतेक हिंदूंचें मत आहे. परंतु अलीकडील कांहीं सुशिक्षित लोकांस हा सिद्धांत मान्य नाहीं. रामायण व भारत वाचून जर त्यांचें हें मत झालें असतें तर त्यास महत्त्व देतां आलें असतें; परंतु पाश्चात्य पंडितांप्रमाणें एखादा ग्रंथ उडत उडत पाहून

त्यावर आपलें ठाम मत देण्याची आमच्या आधुनिक विद्वानांस जी वाईट संवय लागली आहे तिचा हा परिणाम आहे. पाश्चात्य विद्वानांनीं जो सिद्धांत काढला तोच बरोबर, व तो ज्यांस मान्य नाहीं ते महामूर्ख, असें समजणारे बरेच सुशिक्षित आमच्यांत आहेत; व कांहींजण तर प्रत्येक गोष्टीस लेखी प्रमाण मागत असतात. हजारों वर्षांपूर्वींच्या गोष्टीस लेखी प्रमाणें सांपडत नाहींत व अशा गोष्टीविषयीं लोकांचा जो पूर्वापर समज चालत आलेला असतो तोच पुष्कळ प्रसंगीं बरोबर असतो, असें युरोपांतील कोणत्याही देशाचा जुना इतिहास वाचणारांचे लक्षांत असेलच; परंतु याच धर्तीवर हिंदुस्थानांतील जुन्या गोष्टींचा एखादा हिंदु विचार करूं लागेल तर मात्र तें आमचे मंडळीस खपत नाहीं ! असो.

भारतानंतरचें रामायण धरण्यास जीं कारणें आहेत त्यांचा आतां थोडक्यांत विचार करूं. रामायणांत बुद्धाचा व राशींचा उल्लेख आहे हें ज्यांनीं वाचलें आहे ते ह्मणतात कीं, ख्रिस्तीशकानंतर दोनशें वर्षांनीं ग्रीक लोकांतून आमच्यांत राशी आल्या; ह्मणून त्यांचा ज्या

ग्रंथांत उल्लेख आहे तो ग्रंथ ख्रिस्तानंतर दोनशें वर्षांनीं झाला असला पाहिजे. भारतांत राशींचा कोठेंही उल्लेख नाहीं, व त्याचें नांव आश्वलायनगृह्यसूत्रांत आलें असून, त्यांतील युधिष्ठिर वगैरे प्रमुख पात्रांचीं नांवें पाणिनींत आलीं आहेत; यावरून भारत रामायणाचे पूर्वींचें आहे. यास असें उत्तर आहे कीं बुद्धाचें नांव रामायणांत फक्त एकदांच आलेलें असून, तेंही अनुष्टुप् श्लोकांत नाहीं.[3] राशींचीं सध्याचीं नांवें कदाचित् ग्रीकांचीं असतील; परंतु त्यांचेपूर्वी हिंदूंस राशी माहीत नव्हत्या असें धरणें बरोबर होणार नाहीं. द्वादशादित्यांची कल्पना फार जुनी आहे, व

---

१. पितृतर्पणाचे आरंभींच, सुमंतु-जैमिनी-वैशंपायन-पैल-सूत्र-भाष्य-भारत-महाभारत-धर्माचार्याः तृप्यंतु, असें वाक्य आहे.

२. गवियुधिभ्यां स्थिरः ॥ ८ अ. ३ पाद. ९५ सूत्र.

श्रविष्ठा-फल्गुन्यनुराधा-स्वाति-तिष्य-पुनर्वसु-हस्त-विशाखाषाढा बहुलाल्लुक् ॥ ४ अ. ३. पा ३४ सू.

द्रोण-पर्वत-जीवन्तादन्यतरस्याम् ॥ ४-१-१०३

वासुदेवार्जुनाभ्यां वुन् ॥ ४-३-९८.

३. यथा हि चोरः स तथा हि बुद्धः ।

तथागतं नास्तिकमत्र विद्धि ॥ अयो. १०९-३४

अयन, विषुव व षडशीतिमुख या संज्ञा भारतांत आढळतात (वनपर्व); ह्मणून पुढें त्यांचा लोप होऊन ग्रीकांच्या संज्ञा प्रचारांत आल्या असें जें कांहीं ज्योतिर्विदांचें मत आहे तेंच बरोबर आहे. रामायणांत राशींचा उल्लेख फक्त तीन ठिकाणीं आला आहे, व त्यांत कर्क तिनदां आली असून मीन एकदां आली आहे[१]; बाकीच्या राशींचा मुळींच उल्लेख नाहीं. युद्धप्रसंगीं व इतर ठिकाणीं ग्रहांची स्थिति भारताप्रमाणें नक्षत्रांतच दिली आहे:

**अवष्टब्धं च मे राम नक्षत्रं दारुणैः ग्रहैः ।**
**आवेदयंति दैवज्ञाः सूर्यांगारकराहुभिः ॥** अ. ४-१८
**अथ चंद्रोऽभ्युपगमत् पुष्यात् पूर्वं पुनर्वसुं ॥** अ. ४-२१
**नैरृतं नैरृतानां च नक्षत्रं अतिपीड्यते ।**
**मूलः मूलवता स्पृष्टः धूप्यते धूमकेतुना ॥**युद्ध ४-५१
**प्राजापत्यं च नक्षत्रं रोहिणीं शशिनः प्रियां ।**
**समाक्रम्य बुधस्तस्थौ प्रजानां अहितावहः ॥**

---

१. ग्रहेषु कर्कटे लग्ने वाक्पतौ इंदुना सह ॥ बा. १८-९
पुष्ये जातस्तु भरतः मीनलग्ने प्रसन्नधीः ।
सार्पे जातौ तु सौमित्री कुलीरेऽभ्युदिते रवौ ॥ बा. १८-१९
लग्ने कर्कटके प्राप्ते जन्म रामस्य च स्थिते ॥ अयो. १५-३

कौसलानां च नक्षत्रं व्यक्तं इंद्राग्निदैवतं ।
आहत्यांगारकस्तस्थौ विशाखं अपि चांबरे ॥

युद्ध. १०२ ( ३२-३६. )

राशींचा व बुद्धाचा उल्लेख सर्व प्रतींतून सांपडत नाहीं हें ज्यास पहाणें असेल त्यानें गोरेशिओचें रामायण पहावें. राम अद्वितीय पराक्रमी होता ह्मणून, त्याचे जन्मकालींही तसेच उच्च ग्रह असले पाहिजेत या समजुतीनें कोणी रामजन्मकालचे श्लोक रामायणांत घातले असतील. हे श्लोक प्रक्षिप्त नसते व मूळपासूनच ते रामायणांत असते, तर रामाच्या कुंडलीसंबंधीं जो घोंटाळा उडाला आहे तसा कधींही झाला नसतां; हीच गोष्ट ते श्लोक प्रक्षिप्त आहेत येवढें सिद्ध करण्यास पुरे आहे. बुद्धाचा उल्लेख एके ठिकाणीं

१. रामाचा जन्म पुनर्वसु नक्षत्रावर झाला असें कांहीं ह्मणतात व कांहीं पुष्यावर झाला असें सांगतात. तसेंच त्यांचे कुंडलींत राहु व बुध हे ग्रह कोणच्या स्थानीं होते याबद्दल मोठा वाद आहे. रामाचा जन्म मध्यान्हीं ह्मणजे १२ घटकांनंतर झाला असतां, रामनवमीचे दिवशीं बरोबर डोक्यावर सूर्य आला असतां रामजन्म करण्याची चुकीची पद्धत पडली आहे; कारण यावेळीं कांहीं केलें तरी रामजन्मकालचें कर्क लग्न येत नाहीं.

असल्यामुळें तें स्थळ प्रक्षिप्त आहे असें पुष्कळ पाश्चात्य पंडितांचें सुद्धां मत आहे[१].

अनुष्टुप् छंदाशिवाय इतर वृत्तांचे जे रामायणांत सर्ग व श्लोक आले आहेत, त्यांपैकीं पुष्कळांचा मूळकथेशीं बिलकुल संबंध नाहीं, व कांहीं श्लोकांत तर अनुष्टुप् छंदांत मागें आलेला मजकूर आला आहे. उदाहरणार्थः—

**यथैव राजा पूज्यस्ते गौरवेण तथा ह्यहं ।**
**त्वां साहं नानुजानामि न गंतव्यं इतः वनं।**अयो.२१-२५
**यथैव ते पुत्र पिता तथाहं ।**
**गुरुः स्वधर्मेण सुहृत्तया च ॥**

---

१. प्रो. याकोबी यांचें असें ह्मणणें आहे कीं अशोकाचे शिलालेख सर्व प्राकृत भाषेंत आहेत यावरून त्याचे वेळीं, ह्मणजे ख्रिस्तापूर्वीं तीनशें वर्षें, हिंदुस्थानांतील लोकांची बोलण्याची भाषा प्राकृत होती. आपल्या काव्यानें सर्व जनसमूहाचें मनोरंजन व्हावें असा कवींचा हेतु असतो. वाल्मीकीनें संस्कृतांत आपलें काव्य रचलें यावरून त्या वेळीं लोकांची बोलण्याची भाषा संस्कृत असली पाहिजे; ह्मणून अशोकाचे पूर्वीं कमींत कमी २०० वर्षें, ह्मणजे अर्थातच बुद्धाचे पूर्वीं वाल्मीकीनें आपलें काव्य रचलें. बुद्धाचे नंतर जर तें काव्य झालें असतें तर त्यांत प्राकृत भाषेंतील पुष्कळ रूपें आलीं असतीं. (रामायणावरील निबंध)

न त्वानुजानामि न मां विहाय ।
सुदुःखितां अर्हसि पुत्र गंतुं ॥ अयो. २१-५२
अन्योन्यबद्धवैराणां जिगीषूणां नृपात्मज ।
उद्योगसमयः सौम्य पार्थिवानामुपस्थितः॥किं.३०·६०
अन्योन्यवैरेण समायुतानां ।
उद्योगकालोद्य नराधिपानां ॥ किं. ३०-३७
ललस्व मयि विस्रब्धा धृष्टं आज्ञापयस्व च ।
मत्प्रसादात् ललंत्याश्च ललतां बांधवास्तव ॥सुं.२०·२४
मयि लल ललने यथासुखं त्वं ।
त्वयि च समेत्य ललंतु बांधवास्ते ॥ सुं. २०-३५

यांत अनुष्टुपछंदांतील मजकूर फिरून इतर छंदांत आला आहे. सुंदरकांड सर्ग ७ व ८, व युद्धकांड सर्ग १४ व १५ यांचा मूळकथेशीं कांहीं संबंध नसून ते गोरेशिओंत नसल्यामुळें प्रक्षिप्त धरण्यास मुळींच हरकत नाहीं. यावरून असें दिसून येतें कीं अनुष्टुभाशिवाय इतर वृत्तांचे पुष्कळ श्लोक प्रक्षिप्त आहेत, व ह्मणून ज्या श्लोकांत बुद्धाचें नांव आहे तो श्लोक अनुष्टुपछंदांत नसल्यामुळें प्रक्षिप्त धरण्यास हरकत नाहीं. रामायणाचे रचनेची बालकांडाचे प्रारंभीं जी हकीकत आहे त्यावरून असें दिस-

तें कीं, क्रौंचपक्षास व्याधानें मारलेला पाहून (बा. २-१५.)

मा निषाद प्रतिष्ठां त्वं अगमः शाश्वतीः समाः ।
यत् क्रौंचमिथुनात् एकं अवधीः काममोहितम् ॥

अशी श्लोकबद्ध वाणी वाल्मीकीचे मुखांतून निघाली व ब्रम्हदेवांनीं जेव्हां त्यास रामचरित्र लिहिण्यास सांगितलें तेव्हां अशाच म्हणजे अनुष्टुप् श्लोकांनीं तें रचण्याची त्यानें प्रतिज्ञा केली. बाल. २ (४०–४१).

समाक्षरैः चतुर्भिः यः पादैर्गीतः महर्षिणा ।
सोऽनुव्याहरणात् भूयः शोकः श्लोकत्वमागतः ॥
तस्य बुद्धिः इयं जाता महर्षेः भावितात्मनः ।
कृत्स्नं रामायणं काव्यं ईदृशैः करवाण्यहं ॥

यावरून माझा असा तर्क आहे कीं, अनुष्टुभाशिवाय इतर वृत्तांतील सर्व भाग वाल्मीकीचा नव्हे, व तो गाळून जरी सध्याची प्रत छापली तरी तींत फारशी विसंगतता येणार नाहीं. असेंच के. तेलंगांचेंही मत आहे; (वेबरला उत्तर). यास एवढाच बाध येतो कीं, रामायणाचे सर्व प्रतींतून इतर वृत्तांचे एकसारखे कांहीं श्लोक व सर्ग आढळतात, व ते वाल्मीकीचे नाहींत असें दाखविण्यास दुसरा प्रत्यक्ष पुरावा नाहीं.

मि. रमेशचंद्र दत्त यांनीं हिंदुस्थानचा जुना इतिहास पाश्चात्य पंडितांच्या ग्रंथाधारें लिहिला आहे, म्हणून त्यांतील मतांचा विचार केला म्हणजे पाश्चात्यांचे ग्रंथांचा पृथक् पृथक् विचार करण्यास नको.[1] भारत रामायणाचे पूर्वीचें आहे असें त्यांनीं तीन प्रमाणांवरून सिद्ध केलें आहे: "(१) आर्यलोक पंजाबांतून हिंदुस्थानांत आले, व ते दिल्लीपर्यंत जाऊन राहिले त्या वेळीं कौरवपांडवांचें युद्ध झालें; याचा कुरुपांचालयुद्ध असा शतपथब्राह्मणांत उल्लेख आढळतो; या वेळीं आर्यलोक अधिक शूर व कमी सुधारलेले होते. (२) येथें कांहीं शतकें राहि-

---

1. "I have simply tried to string together in a methodical order the results of the labours of abler scholars, in order to produce a readable work for the general reader." Introduction Vol. I. page 12.

" I think there can be no question that it is later than the Mahâbhârata; for a vast interval of thought separates the patriarchal and feudal manners of the Mahâbhârata and the monarchical tone of the Râmâ'yana, where despotism is checked only by the power of priests." Poole.

त्यावर ते पुढें अयोध्या, बंगाल वगैरे प्रांतांत गेले; तेव्हां त्यांच्या शौर्याचा बराच लोप झाला, रीतीभातींत फार सुधारणा झाली, व कायद्यांचा अंमल त्यांजवर पूर्णपणें बसला, व यावेळीं रामायणांतील गोष्टी घडल्या. (३) भारतांत द्वारका, बंगाल, महाराष्ट्र, दक्षिण हिंदुस्थान व सीलोन वगैरे देशांचीं व त्यांतील लोकांचीं वर्णनें अगदीं अलीकडे घुसडलेलीं आहेत; मूळच्या भारतांत तीं नव्हतीं. ख्रिस्तीशकापूर्वीं पांचशें वर्षें विजयानें सीलोन जिंकलें, त्याचेपूर्वीं आर्यांस त्याची माहिती नव्हती. रामायणांत दक्षिणेंतील लोकांस वानर व लंकेंतील लोकांस राक्षस ह्मटलें आहे, यावरून विजयाचे सीलोनवरील स्वारीचे अगोदर बहुधा तें रचलेलें असावें. भारताचा काल ख्रि. पूर्वीं १४०० पासून १२०० पर्यंतचा असून, रामायणाचा १२०० पासून १००० वर्षांपर्यंतचा आहे." (पान २१२-२१४)

आर्य लोक दिल्लीपर्यंत आले त्याच वेळीं कौरवपांडवांचें युद्ध झालें व पुढें ते अयोध्येपर्यंत गेले त्या वेळीं राम झाले असें जें मि० दत्त यांचें म्हणणें आहे त्यास त्यांनीं आधार दिलेला नाहीं. रामायणापेक्षां भारतांत

विंध्याचे दक्षिणेच्या प्रदेशांचें व लोकांचें पुष्कळ ठिकाणीं सविस्तर वर्णन आहे ( सभापर्व पहा ), व यामुळें रामायणानंतरचें भारत होईल म्हणून हें वर्णन मागाहून घुसडलेलें आहे असें दत्त म्हणतात. ( पान १८५ ) परंतु यासही ते कांहीं आधार देत नाहींत. भारतांतील अमुक भाग मूळचा व अमुक मागचा असें ठरविणें फार कठीण आहे, व असें ज्यास करावयाचें असेल त्यानें आपले बाजूस भरभक्कम पुरावा आणला पाहिजे. आपलें एका गोष्टीबद्दल अमुक मत आहे ह्मणून तिच्याविरुद्ध सर्व गोष्टी मागाहून घुसडल्या गेल्या असें जो ह्मणेल, तो सयुक्तिक बोलत नाहीं असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. माझें असें मत आहे कीं सर्व उत्तरहिंदुस्थानांत ज्या वेळीं आर्यांची वसाहत झाली त्या वेळचा रामायण ग्रंथ असून, ज्यावेळीं सर्व हिंदुस्थानांत ते पसरले त्यावेळीं भारत रचलें गेलें. आतां दत्तांच्या आक्षेपांचें थोडक्यांत निरसन करून ही प्रस्तावना आटोपूं.

रामायणांतील योद्धे भारतांतील योध्यांपेक्षां कमी नसून उलट इतके पराक्रमी आहेत कीं भारतांतील योद्धे

त्यांच्या पासंगासही लागत नाहींत. त्रैलोक्य जिंकून सर्व देवांस बंदींत टाकणारा व पंचमहाभूतांवर आपली सत्ता गाजविणारा रावण व त्याच्यापेक्षां कांकणभर जास्त जो इंद्रजित, त्यांची बरोबरी भारतांतील कोणचा योद्धा करील बरें? एका बाणानें ताटका, सुबाहू, मारीच वगैरे राक्षसांस मारणारा, सप्त तालांचा भेद करणारा, व २१ वेळां निःक्षत्रिय पृथ्वी करणाऱ्या परशुरामाचा गर्व उतरणारा जो राम, त्याच्याशीं कोणाचें साम्य आहे? या रामाचा सेवक तरी केवढा पराक्रमी होता! ज्यानें १०० योजनें समुद्र उल्लंघून अशोकवन भग्न केलें व हजारों राक्षस मारून लंका जाळली, लक्ष्मण मूर्च्छित पडला असतां ज्यानें गंधमादनपर्वत एका क्षणांत उपटून आणला, ज्याचे भुभुःकारानें कौरवांकडील योद्धे प्राण सोडीत, व ज्याचे समुद्रोल्लंघनकालच्या रूपाची सोळावी कळा पहाण्यास भीमही असमर्थ झाला, त्या मारुतीची कौरवपांडवांकडील कोणच्या वीराशीं तुलना करतां येईल? घटोत्कचासारखा कौरवपांडवांत एकही योद्धा नव्हता तरी बिभीषणाचे यःकश्चित् द्वारपालानें त्याचे सहज कान उपटले! या गोष्टी जर दत्तांस माहीत असत्या तर त्यांनीं, भारतीय योद्धे रामायणांतील

योध्यांहून श्रेष्ठ, असा लंगडा सिद्धांत कधींही केला नसता. आतां भारतापेक्षां रामायणांतील लोक अधिक सुधारलेले होते, हा जो दत्तांचा मुद्दा आहे त्यासंबंधानें सुधारणेच्या चार पांच अंगांचा विचार करूं.

प्रथम युद्धकला घेऊं. इजसंबंधानें पहातां असें दिसून येतें कीं, भारती युद्धांत जितके व्यूह रचले गेले व जितक्या अस्त्रांची योजना झाली, त्याचे दशांशाचा सुद्धां रामायणीय युद्धांत उपयोग केलेला नाहीं. कौरवपांडवांकडील सर्व योद्धे प्रत्येक दिवशीं युद्धांत हजर असून द्वंद्वयुद्धें किंवा संकुलयुद्धें करीत, व युद्धापूर्वी आपण अमक्यास मारणार अशा त्यांनीं प्रतिज्ञा केल्या होत्या. भीष्म, द्रोण, भूरिश्रवा, जयद्रथ, कर्ण व दुर्योधन या सहा योध्यांस पांडवांनीं जसे अधर्मानें मारलें तसें कौरवांनीं अभिमन्यूस मारलें; असा युद्धप्रकार रामायणांत दिसत नाहीं. रावण आपले सर्व सैन्यासह रामाशीं युद्ध करीत नाहीं, तो एक एक योद्धा लंकेबाहेर पाठवितो; तो मेला ह्मणजे दुसरा युद्धास येतो, व याप्रमाणें सर्व राक्षसांचा नाश होतो. रावण, कुंभकर्ण व इंद्रजित हे तिघे जर एकदम युद्धास आले असते तर तें युद्ध अद्वितीयच झालें असतें. रामांनीं सुद्धां

सर्व प्रमुख योध्यांसह लंकेवर हल्ला केला नाहीं, तर जो योद्धा लंकेंतून बाहेर येई त्याचे योग्यतेप्रमाणें राम आपल्या सैन्यांतील योध्यांची योजना करीत. या युद्धांत एकही वीर अधर्मानें मारला गेला नाहीं. जीं युद्धें झालीं तीं द्वंद्वयुद्धें झालीं, संकुलयुद्ध झालें नाहीं. भारती युद्धांत कृष्ण व शल्य हे सारथ्यकर्मांत फार निपुण असून त्यांनीं युद्धप्रसंगीं आपले कौशल्यानें अर्जुन व कर्ण यांचें रक्षण केलें होतें. कृष्ण जर अर्जुनाचा सारथी नसता तर पांडवांस खास जय मिळाला नसता. रामायणांत कृष्णासारखा एकही चतुर सारथी नाहीं, व लक्ष्मणानें इंद्राजिताचा व रामानें कुंभकर्णाचा वध रथाशिवायच केला. तसेंच भगदत्ताचा हत्ती फार प्रबळ असून युद्धकलेंत निष्णात होता व त्याचे साहाय्यानें त्यानें पांडवांकडील पुष्कळ योद्धे मारले होते; त्याप्रमाणेंच शाल्व वगैरे इतर राजांचे हत्तीही युद्धांत निपुण होते. रामायणांत अशा सुशिक्षित हत्तींची युद्धांत योजना केलेली मुळींच दृष्टीस पडत नाहीं, व गदायुद्ध व खड्गयुद्ध यांतही कोणी निपुण होता असें दिसत नाहीं. यावरून रामायणापेक्षां भारतकालीं युद्धकलेचा अधिक उत्कर्ष झाला होता असें सिद्ध होतें.

दुसऱ्यानदां वैद्यक घेऊं. रामायणांत ज्वर व नेत्ररोग ( यु. ११५-१७ ) येवढेच दोन रोग आले असून फक्त नस्य ( यु. ९१-२४ ) या उपायाची योजना आढळते. भारतांत राजयक्ष्मा, अपस्मार, संग्रहणी, कुष्ट, उदर, सन्निपात वगैरे महाव्याधि आल्या असून वैद्यकाचीं अष्टांगें व वात, पित्त, कफ यांचाही त्यांत उल्लेख आहे. शारीरशास्त्रांतील प्रमुख नांवें त्यांत आलीं असून गर्भधारणा व वाढ यांचें सविस्तर वर्णन ठिकठिकाणीं आढळतें. अंबिकेनें गर्भधारणप्रसंगीं डोळे मिटले ह्मणून तिचा पुत्र धृतराष्ट्र अंध झाला, व अंबालया विवर्ण झाली ह्मणून तिचा पुत्र पंडु पांडुरवर्ण झाला; जिला शूर पुत्र व्हावा अशी इच्छा असेल तिनें गरोदर असतांना युद्धकथा ऐकाव्या; कहोडाचें वेदाध्ययन ऐकून गर्भांतच अष्टावक्रास सर्व वेद येऊं लागले, इत्यादि भारतांत जीं ठिकठिकाणीं वर्णनें आहेत त्यांत बराच अर्थ असून, त्यावरून १९ व्या शतकांत ज्या शास्त्रीय गोष्टी पाश्चात्य लोक ठरवीत आहेत त्यांपैकीं गर्भधारणेसंबंधीं तरी आमचे लोकांस पुष्कळ माहिती होती असें सिद्ध होतें. ह्मणून वैद्यकाचे दृष्टीनें रामायणांतल्यापेक्षां भारतांतील लोक सुधारलेले होते.

अध्यात्मज्ञानाचा रामायणांत मुळींच विचार केलेला नाहीं व चारी वर्णांचे धर्मही सांगितलेले नाहींत. भारतांतील कणिकनीति, विदुरनीति, यक्षप्रश्न, गीता, सनत्सुजातीय, अनुगीता, शांतिपर्व व अनुशासनपर्व यांचे तोडीचें एकही स्थळ, तसे प्रसंग आले असतांही, रामायणांत आढळत नाहीं. रामायणांत ऋक्ष, कंडु, गाथा, ब्रह्मा, मनु, श्रुति, व हस्ती यांचींच अवतरणें असून त्याचे फक्त १० श्लोक आहेत. भारतांत लोकांनीं सांगितलेल्या आख्यानांनीं निम्मा भाग भरला असून शिवाय त्यांत शेंकडों लोकांचे उतारे घेतले आहेत. अत्रि, अथर्वा, अलर्क, अंगिरा, अंबरीष, इंद्र, उशनस्, काम, काश्यप, गार्ग्य, जनक, जमदग्नि, दीर्घतमा, देव, देवल, धर्मशास्त्र, धौम्य, नारद, नारायण, पराशर, प्रजापति, बृहस्पति, ब्रह्मवादी, ब्रह्मा, ब्राह्मण, भूमि, मनु, मरुत्त, मार्कंडेय, मातंग, मांडव्य, यम, ययाति, विभावसू, विश्वावसू, वेद, शंभर, शांडिल्य, श्री, श्वेतकेतू, सत्यवान, सुधन्वा, संत, स्मृति व हरिश्चंद्र यांचीं वचनें, प्राचीन श्लोक, धर्मशास्त्र, सर्पमंत्र व ज्यातकमंत्र भारतांत आले आहेत. यांत वेद, ब्रह्मा, मनु, बृहस्पति व शुक्र यांचीं अवतरणें फार आहेत; व यावरूनही रामायणानंतर

पुष्कळ शतकांनीं भारत रचलें गेलें असावें असें उघड होतें.

ज्योतिषासंबंधानें पाहतांही रामायणापेक्षां भारतांत सुधारणा झालेली दिसते. रामायणांत फक्त १५ नक्षत्रें आलीं असून भारतांत सर्व नक्षत्रें आलीं आहेत (अनु.प. अ. ६४).चंद्राची पृथ्वीवरील लोकांस फक्त एकच बाजू दिसते हा शोधहि भारताचे वेळीं झाला होता व तो दृष्टांताच्या रूपानें एका श्लोकांत आला आहे. याहीपेक्षां भारत रामायणानंतरचें आहे हें दाखविण्याची सोपी युक्ती आहे. वानरसैन्यासह राम जेव्हां समुद्रतीरीं गेले व लंकेस जाण्याचा उपाय शोधूं लागले त्यावेळीं त्यांनीं मोठमोठीं लांकडें दोऱ्यांनीं बांधलीं व त्यावर धोंडे ठेवून सेतू तयार केला असें रामायणांत वर्णन आहे. भारताचे वेळची स्थिती अधिक सुधारली असल्यामुळें त्या वेळीं सैन्याबरोबर नद्या व समुद्र ओलांडण्याकरतां नावा असत. भारतांत रामाजवळ सर्व सैन्य लंकेंत नेण्यास पुरेशा नावा नव्हत्या ह्मणून व्यापाऱ्यांच्या नौका घेऊन त्यांतून सैन्य न्यावें, अशी कांहींनीं सूचना केली होती; परंतु व्यापाऱ्यांच्या नावा सैन्याच्या कामीं लावल्या असतां व्यापारास धोका बसेल असें सांगून रामांनीं त्यांचें

समाधान केलें. रामायणांत सैन्याबरोबरच्या नावा, व लंकेजवळील गलबतांचा व्यापार याचा मुळींच उल्लेख नसून भारतांत ज्या अर्थी त्याचें वर्णन आहे, त्या अर्थी भारतकालीं हिंदूंचा गलबतांतील व्यापार पुष्कळ वाढला होता, ह्मणजे त्या वेळचे लोक रामायणकालापेक्षां अधिक सुधारले होते असें उघड दिसत नाहीं काय?

वरील विवेचनावरून वाचकांचे लक्षांत येईल कीं, रामायणावर लोक जे आक्षेप आणतात त्यांत कांहीं अर्थ नाहीं व त्यांस मुळींच आधार नाहीं. रामायणानंतरचें भारत आहे या तुमचे ह्मणण्यास तरी काय आधार आहे असा कोणी साहजिक प्रश्न करील, म्हणूनच भारतांतील निरनिराळ्या वचनांच्या आधारानें राम, वाल्मीकि, व रामायणग्रंथ हे सर्व भारताचे पूर्वींचे आहेत असें मी आतां निर्विवाद सिद्ध करणार आहें.

भारताची ज्यांना फारशी माहिती नाहीं ते असें ह्मणतात कीं वनपर्वाचे शेवटीं आलेल्या रामोपाख्यानांतच रामाची कथा भारतांत आली आहे, इतर ठिकाणीं नाहीं व हें आख्यान रामायणानंतर कोणी

भारतांत घुसडून दिलें आहे. रामोपाख्यानाचे मागचेच अध्यायांत वराह, नृहरि व वामन या तीन अवतारांच्या कथा आल्या आहेत त्यावरून हें आख्यान पूर्वकथानुसंधानाशीं विरोधी दिसत नाहीं, व हें सांगून द्रौपदीहरणाचें धर्मराजाचें दुःख मार्कंडेयांनीं निवारण केलें आहे ह्मणून हें प्रक्षिप्त धरतां यावयाचें नाहीं. रामोपाख्यानाशिवायही भारतांत रामायणीय कथेचे शेंकडों उल्लेख आहेत, व ते सर्व मीं पुढें दिले आहेत. विषय सुलभ व्हावा ह्मणून मीं याचे ६ भाग केले आहेत, ते येणेंप्रमाणें:--

( १ ) **रामकथेचे उल्लेख.** यांत ज्या कथांत रामाचा प्रत्यक्ष संबंध आला आहे त्या कथा घेतल्या आहेत; यांत कांहीं रामायणांत न सांपडणाऱ्या कथा आहेत, परंतु त्या अगदीं विरुद्ध नसल्यामुळें येथेंच दिल्या आहेत.

( २ ) **रामायणांतील इतर कथा.** यांत ज्यांत रामाचा प्रत्यक्ष संबंध नाहीं अशा कथा घेतलेल्या आहेत.

( ३ ) **रामायणाविरुद्ध भारतांत आढळणाऱ्या**

**कथा.** यांत ज्या कथा धडधडीत रामायणाविरुद्ध आहेत त्या घेतल्या आहेत.

( ४ ) **वाल्मीकीचे नांवाचे उल्लेख.**

( ५ ) **रामायणग्रंथाचे उल्लेख.**

( ६ ) **सारखे श्लोक**–यांत व्यासांनीं जे श्लोक रामायणांतून जसेच्या तसे घेतले ते प्रथम देऊन ज्यांत थोडा फरक आहे ते नंतर दिले आहेत. यांतच भारतकारांनीं घेतलेल्या रामायणांतील श्लोकांचे उताऱ्यांचा विचार करणार आहें.

या साही भागांतील श्लोक मुंबईत छापलेल्या भारताच्या व रामायणाच्या प्रतींतून घेतलेले आहेत. जेथें दुसऱ्या प्रांतांतील प्रतींतून श्लोक घेतले आहेत तेथें त्यांचा नामनिर्देश केला आहे.

---

# रामकथेचे उल्लेख.

१. कालाचे तडाक्यांत जे मोठमोठे राजे सांपडले त्यांत राम होताः—

रामं दाशरथिं चैव शशबिंदुं भगीरथं॥आदि१-२२८

२. भीष्मद्रोण हे रामाच्या योग्यतेचे आहेत असें विदुर धृतराष्ट्रास सांगतोः-आदि. २०५-६

धर्मे चानवरौ राजन् सत्यतायां च भारत ।
रामात् दाशरथेश्चैव गयाच्चैव न संशयः ॥

३. कौरवांकडून दुसऱ्यांदा द्यूताचें बोलावणें आलें तेव्हां धर्म ह्मणतो कीं, संकटकाल समीप आला असतां मनुष्याचे बुद्धीस मोह उत्पन्न होतो. राम देखील सुवर्णमृगाचे मागें गेले. सभा० ७६-५

असंभवे हेममयस्य जंतोः तथापि रामोलुलुभे मृगाय
प्रायः समासन्नपराभवाणां धियोविपर्यस्ततराभवंति

४. द्वैतवनीं द्रौपदीस व धर्मास पाहून मार्कंडेयास रामाची आठवण झाली, व ऋष्यमूकपर्वतावर वनवासाकरतां पित्राज्ञेनें राम गेले अशी कथा त्यांनीं सांगितली. वन० २५ ( ६-११ )

तवापदं स्वद्य समीक्ष्य रामं सत्यव्रतं दाशरथिं स्मरामि॥
स चापि राजा सहलक्ष्मणेन वने निवासं पितुरेव शासनात्
धन्वी चरन् पार्थमयैव दृष्टः गिरेः पुरा ऋष्यमूकस्य सानौ
सहस्रनेत्रप्रतिमोमहात्मा यमस्य नेता नमुचेश्च हंता
पितुर्निदेशात् अनघः स्वधर्मे वासं वने दाशरथिश्चकार ॥
स चापि शक्रस्य समप्रभावः महानुभावः समरेष्वजेयः ॥
विहाय भोगान् अचरद्वनेषु नेशे बलस्येति चरेदधर्मं ॥

५. गोप्रतारतीर्थाहून राम स्वर्गी गेले. वन० ८४.

गोप्रतारं ततो गच्छेत् सरय्वास्तीर्थमुत्तमं ।
यत्र रामो गतः स्वर्गं सभृत्यबलवाहनः ॥ (७०-७१)

६. गोमतींतील रामतीर्थी स्नान केलें म्हणजे अश्वमेधाचें फळ मिळतें. वन० ८४. (७३-७४)

रामतीर्थे नरः स्नात्वा गोमत्यां कुरुनंदन ।
अश्वमेधं अवाप्नोति पुनाति च कुलं नरः ॥

७. संवेद्यतीर्थी स्नान केल्यानें रामप्रभावानें विद्या प्राप्त होते. वन० ८५. (१-२)

अथ संध्यां समासाद्य संवेद्यं तीर्थमुत्तमम् ।
उपस्पृश्य नरो विद्यां लभते नात्र संशयः ।
रामस्य च प्रभावेण तीर्थं राजन् पुराकृतं ॥

८. शृंगवेरपुराजवळ जेथून राम गंगा उतरून गेले तेथें स्नान केलें असतां सर्व पातकें भस्म होतात. वन० ८५ (६५-६६).

**ततो गच्छेत राजेंद्र शृंगवेरपुरं महत् ।**
**यत्र तीर्णः महाराज रामोदाशरथिः पुरा ॥**
**तस्मिन् तीर्थे महाबाहो स्नात्वा पापैः प्रमुच्यते ॥**

९. तीर्थयात्रेनें महाभिष, भगीरथ व रामास जशी कीर्ति मिळाली तशी तुला मिळेल असें पुलस्त्य धर्मराजास सांगतात. वन. ८५ (१२४–१२६)

**प्राप्स्यसे महतीं कीर्तिं यथा राजा महाभिषः ।**
**यथा भगीरथो राजा यथा रामश्च विश्रुतः ॥**

१०. पूर्वी मानससरोवराच्या द्वारीं राम १ वर्ष राहिले होते. वन. १३०-१२

**एतद्द्वारं महाराज मानसस्य प्रकाशते ।**
**वर्षमस्य गिरेर्मध्ये रामेण श्रीमता कृतं ॥**

११. सौगंधिक कमलें आणण्याकरतां गंधमादन पर्वतावर भीम जात असतां त्यास उपदेश करण्याकरतां मारुती वाटेंत बसला. त्यास पाहून भीम ह्मणाला माझा रस्ता सोड. तो म्हणाला व्याधिग्रस्त झाल्यामुळें मला

हलण्याची शक्ती नाहीं, तूं मला ओलांडून जा. भीम ह्मणाला यायोगानें ईश्वराचा अपमान होईल ह्मणून मला तसें करतां येत नाहीं; नाहींतर मारुतीनें जशी समुद्रावरून उडी मारली तशी तुझ्या सुद्धां या पर्वतावरून मीं उडी मारली असती. तो म्हणाला समुद्रोल्लंघन केलेला मारुती कोण. भीम म्हणाला तो माझा भाऊ आहे. (वन अध्याय १४७).

यथागमैः न विद्यां च तमहं भूतभावनं ।
क्रमेयं त्वां गिरिं चैव हनूमानिव सागरं ॥ ९ ॥

हनूमान् । क एष हनुमान्नाम सागरो येन लंघितः ।
पृच्छामि त्वां नरश्रेष्ठ कथ्यतां यदि शक्यते ॥ १० ॥

भीमः । भ्राता मम गुणश्लाघ्यः बुद्धिसत्वबलान्वितः ।
रामायणेऽतिविख्यातः श्रीमान् वानरपुंगवः ॥ ११ ॥

रामपत्नीकृते येन शतयोजनविस्तृतः ।
सागरः प्लवगेंद्रेण क्रमेणैकेन लंघितः ॥ १२ ॥

स मे भ्राता महावीर्यः तुल्योहं तस्य तेजसा ।
बले पराक्रमे युद्धे शक्तोऽहं तव निग्रहे ॥ १३ ॥

याप्रमाणें भाषण झाल्यावर मारुती म्हणाला जर तूं माझी शेपटी ओलांडून जात नाहींस तर ती उचलून

बाजूला ठेव व मग पुढें जा. भीमाला आपल्या बलाचा मोठा गर्व होता, म्हणून एका हातानें तो ती उचलूं लागला, परंतु ती त्यास हलेना. तेव्हां दोन्हीं हातांनीं उचलण्याचा त्यानें होता तेवढा प्रयत्न केला, तरी ती जेव्हां हालेना तेव्हां हा यःकश्चित् मर्कट नसून कोणी देव, यक्ष किंवा गंधर्व असावा असें भीमास वाटलें व हात जोडून त्यानें प्रार्थना केली कीं माझी चुकी झाली, त्याची क्षमा करा व आपण कोण आहां तें मला सांगा. तेव्हां मारुती म्हणाला मी वायूचा पुत्र हनूमान आहें. सुग्रीवास जेव्हां सर्व वानर मिळाले तेव्हां मी त्याकडे गेलों व ऋष्यमूक पर्वतावर राहिलों. थोडे दिवसांनीं राम तेथें आले, व सुग्रीवाचें त्यांचें सख्य झालें. रामांनीं वालीस मारून सुग्रीवास राज्य दिलें व सुग्रीवानें सीतेच्या शोधार्थ दाही दिशांस वानर पाठविले. मी दक्षिण दिशेस गेलों. संपातीनें सीतेचा शोध सांगितल्यावर मीं शंभर योजनें समुद्र उल्लंघन केला, व सीतेस भेटून व लंका जाळून परत आलों. नंतर सेतू बांधून रामांनीं रावणाचा पुत्रपौत्रासह वध केला व बिभीषणास राज्य दिलें. अयोध्येस परत आल्यावर या पृथ्वीवर रामकथा जोंपर्यंत आहे तोंपर्यंत मला आ-

युष्य असावें असा मीं रामाजवळ वर मागितला व तो त्यांनीं दिला. ११ हजार वर्षें राज्य करून राम स्वर्गलोकीं गेले. ( वन १४७–१४८ ).

हनू । यत्ते मम परिज्ञाने कौतूहलमरिंदम ।
तत्सर्वं अखिलेन त्वं श्रुणु पांडवनंदन ॥ २६ ॥
अहं केसरीण क्षेत्रे वायुना जगदायुना ।
जातः कमलपत्राक्ष हनूमान्नाम वानरः ॥ २७ ॥
सूर्यपुत्रं च सुग्रीवं शक्रपुत्रं च वालिनं ।
सर्वे वानरराजानः तथा वानरयूथपाः ॥ २८ ॥
उपतस्थुः महावीर्याः मम चामित्रकर्षण ।
सुग्रीवेणाभवत् प्रीतिः अनिलस्याग्निना यथा ॥२९॥
निकृतः स ततोभ्रात्रा कस्मिंश्चित् कारणांतरे ।
ऋष्यमूके मया सार्धं सुग्रीवः न्यवसत् चिरं ॥३०॥
अथ दाशरथिर्वीरः रामः नाम महाबलः ।
विष्णुः मानुषरूपेण चचार वसुधातलं ॥ ३१ ॥
स पितुः प्रियमन्विच्छन् सहभार्यः सहानुजः ।
सधनुः धन्विनां श्रेष्ठः दंडकारण्यमाश्रितः ॥३२॥
तस्य भार्या जनस्थानात् छलेनापहृता बलात् ।

राक्षसेंद्रेण बलिना रावणेन दुरात्मना ॥ ३३ ॥
सुवर्णरत्नचित्रेण मृगरूपेण रक्षसा ।
वंचयित्वा नरव्याघ्रं मारीचेन तदानघ ॥ ३४ ॥

॥ इति १४७ अध्यायः ॥

हनूमान्। हृतदारः सह भ्रात्रा पत्नीं मार्गन् स राघवः।
दृष्टवान् शैलशिखरे सुग्रीवं वानरर्षभं ॥ १ ॥
तेन तस्याभवत् सख्यं राघवस्य महात्मनः ।
स हत्वा वालिनं राज्ये सुग्रीवं अभिषिक्तवान् ॥ २ ॥
स राज्यं प्राप्य सुग्रीवः सीतायाः परिमार्गणे ।
वानरान् प्रेषयामास शतशोऽथ सहस्रशः ॥ ३ ॥
ततः वानरकोटीभिः सहितोऽहं नरर्षभ ।
सीतां मार्गन् महाबाहो प्रयातः दक्षिणां दिशां ॥४॥
ततः प्रवृत्तिः सीतायाः गृध्रेण सुमहात्मना ।
संपातिना समाख्याता रावणस्य निवेशने ॥ ५ ॥
ततोऽहं कार्यसिध्यर्थं रामस्याक्लिष्टकर्मणः ।
शतयोजनविस्तारं अर्णवं सहसा प्लुतः ॥ ६ ॥
अहं स्ववीर्यात् उत्तीर्य सागरं मकरालयं ।
सुतां जनकराजस्य सीतां सुरसुतोपमां ॥ ७ ॥

दृष्टवान् भरतश्रेष्ठ रावणस्य निवेशने ।
समेत्य तां अहं देवीं वैदेहीं राघवप्रियां ॥ ८ ॥

दग्ध्वा लंकां अशेषेण साट्टप्राकारतोरणां ।
प्रत्यागतश्चास्य पुनः नाम तत्र प्रकाश्य वै ॥ ९ ॥

मद्वाक्यं चावधार्याशु रामः राजीवलोचनः ।
स बुद्धिपूर्वं सैन्यस्य बध्वा सेतुं महोदधौ ॥ १० ॥

वृतः वानरकोटीभिः समुत्तीर्णः महार्णवं ।
ततः रामेण वीर्येण हत्वा तान् सर्व राक्षसान् ॥११।

रणे तु राक्षसगणं रावणं लोकरावणं ।
निशाचरेंद्रं हत्वा तु सभ्रातृसुतबांधवं ॥ १२ ॥

राज्येऽभिषिच्य लंकायां राक्षसेंद्रं विभीषणं ।
धार्मिकं भक्तिमंतं च भक्तानुगतवत्सलं ॥ १३ ॥

ततः प्रत्याहृता भार्या नष्टा वेदश्रुतिः यथा ।
तथैव सहितः साध्व्या पत्न्या रामः महायशाः ॥ १४।

गत्वा ततोऽतित्वरितः स्वां पुरीं रघुनंदनः ।
अध्यावसत्ततोऽयोध्यां अयोध्यां द्विषतां प्रभुः॥१५।

ततः प्रतिष्ठितः राज्ये रामः नृपतिसत्तमः ।
वरं मया याचितोऽसौ रामः राजीवलोचनः ॥१६॥

उ. १०८। यावद्राम कथेयं ते भवेत् लोकेषु शत्रुहन् ।
तावज्जीवेयमित्येवं तथास्त्विति च सोऽब्रवीत् ॥१७॥
सीताप्रसादाच्च सदा मां इहस्थं अरिंदम ।
उपतिष्टंति दिव्या हि भोगाः भीम यथेप्सिता ॥१८॥
बाल-१-९७-।दशवर्षसहस्राणि दशवर्षशतानि च ।
राज्यं कारितवान् रामः ततः स्वभवनं गतः ॥१८॥
तत इहाप्सरसस्तात गंधर्वाश्च सदाऽनघ ।
तस्य वीरस्य चरितं गायंत्यः रमयंति मां ॥१९॥
अयं च मार्गः मर्त्यानां अगम्यः कुरुनंदन ।
ततोऽहं रुद्धवान् मार्गं तवेमं देवसेवितं ॥ २१ ॥
धर्षयेत् वा शपेत् वापि मा कश्चिदिति भारत ।
दिव्यः देवपथोह्येष नात्र गच्छंति मानुषाः ।
यदर्थं आगतश्चासि अत एव सरश्च तत् ॥ २२ ॥

॥ इति १४८ अध्यायः॥

याप्रमाणें संक्षिप्त रामचरित्र ऐकल्यावर भीम मारुतीस ह्मणाला कीं समुद्रोल्लंघनाचे वेळीं धारण केलेलें आपलें स्वरूप मला दाखीव. तेव्हां मारुती ह्मणाला कीं युगायुगांत प्राणिमात्रांचें सामर्थ्य कमी होत जातें. सध्यां कलियुग लागण्याचा समय आहे, ह्मणून तें रूप मला धारण करतां येत नाहीं (अध्याय १४९); परंतु भीम

आग्रह सोडीना ह्मणून मारुतीनें समुद्रोल्लंघनाच्या वेळच्या रूपाचा थोडासा मासला दाखविला. तो पाहूनच भीमाची बोबडी वळली. मग थोडा धीर धरून ह्मणाला कीं तुझ्यासारखा वीर रामापाशीं असतां रावणास मारण्यास तो कां गेला हें मला समजत नाहीं. मारुती ह्मणाला तूं ह्मणतोस हें खरें, मी रावणास मारला असता, परंतु त्या योगानें रामाची कीर्ति झाली नसती. वन.(१५०).

एवमेतन्महाबाहो यथा वदसि भारत ।
भीमसेन न पर्याप्तः ममाऽसौ राक्षसाधमः ॥ १८ ॥
सु. ३७ । मया तु निहते तस्मिन् रावणे लोककंटके ।
कीर्तिर्नश्येत् राघवस्य तत एतत् उपेक्षितं ॥ १९ ॥

१२. जयद्रथानें द्रौपदीचें हरण केल्यावर भीमादिकानीं त्याचा पराभव केला, व त्याचे पांच पाट काढून सोडून दिलें. याचें धर्मराजास फार वाईट वाटून त्यानें मार्कंडेयास प्रश्न केला कीं माझ्यासारखा दुसरा दुःखी प्राणी या जगांत तुह्मांस आढळला काय? तेव्हां ते ह्मणाले तुझ्यासारखें रामास दुःख प्राप्त झालें. त्याचीही स्त्री रावणानें हरण केली होती. तेव्हां युधिष्ठिर ह्मणाला रामाचें सविस्तर चरित्र मला सांगा. मार्कंडेय म्हणाले, इक्ष्वाकुवंशांत दशरथ राजा होता. त्यास कौसल्या, सु-

मित्रा व कैकेयी अशा तीन स्त्रिया होत्या; त्यांस अनुक्रमें राम, लक्ष्मण, भरत व शत्रुघ्न असे चार पुत्र होते. जनकास सीता नांवाची मुलगी होती तिचें रामाशीं लग्न झालें. ब्रम्हदेवाचा मानसपुत्र पुलस्त्य व त्याचा वैश्रवण होता. ब्रह्मदेवानें वैश्रवणास धनेशत्व, अमरत्व व लोकपालत्व देऊन राहण्यास लंका नगरी दिली. ( वन. २७३—२७४. )

अस्ति नूनं मया कश्चित् अल्पभाग्यतरः नरः ॥
भवता दृष्टपूर्वः वा श्रुतपूर्वोऽपि वा भवेत्॥वन२७३-१३
मार्कंडेयः। प्राप्तं अप्रतिमं दुःखं रामेण भरतर्षभ ॥
रक्षसा जानकी तस्य हृता भार्या बलीयसा ॥ १ ॥
आश्रमात् राक्षसेंद्रेण रावणेन दुरात्मना ॥
मायामास्थाय तरसा हत्वा गृध्रं जटायुषं ॥ २ ॥
प्रत्याजहार तां रामः सुग्रीवबलमाश्रितः ॥
बध्वा सेतुं समुद्रस्य दग्ध्वा लंकां शितैः शरैः ॥३॥
यु०। कस्मिन् रामः कुले जातः किं वीर्यः किं पराक्रमः
रावणः कस्य पुत्रः वा किं वैरं तस्य तेन ह ॥ ४ ॥
एतन्मे भगवन् सर्वं सम्यक् आख्यातुमर्हसि ॥
श्रोतुं इच्छामि चरितं रामस्याक्लिष्टकर्मणः ॥ ५ ॥

मा.।अजः नामाऽभवद्राजा महान् इक्ष्वाकुवंशजः॥
तस्य पुत्रः दशरथः शश्वत् स्वाध्यायवान् शुचिः ॥६॥
अभवन् तस्य चत्वारः पुत्राः धर्मार्थकोविदाः ॥
रामलक्ष्मणशत्रुघ्नाः भरतश्च महाबलः ॥ ७ ॥
रामस्य माता कौसल्या कैकेयी भरतस्य तु ॥
सुतौ लक्ष्मणशत्रुघ्नौ सुमित्रायाः परंतपौ ॥ ८ ॥
विदेहराजः जनकः सीता तस्यात्मजा विभो ॥
यां चकार स्वयं त्वष्टा रामस्य महिषीं प्रियां ॥ ९ ॥
एतत् रामस्य ते जन्म सीतायाश्च प्रकीर्तितं ।
रावणस्यापि ते जन्म व्याख्यास्यामि जनेश्वर ॥१०॥
पितामहः रावणस्य साक्षात् देवः प्रजापतिः ।
स्वयंभूः सर्वलोकानां प्रभुः स्रष्टा महातपाः ॥ ११ ॥
पुलस्त्यः नाम तस्यासीत् मानसः दयितः सुतः ।
तस्य वैश्रवणः नाम गवि पुत्रोऽभवत्प्रभुः ॥ १२ ॥
पितरं स समुत्सृज्य पितामहमुपस्थितः ।
तस्य कोपात्पिता राजन् ससर्जात्मानमात्मना ॥१३॥
स जज्ञे विश्रवा नाम तस्यात्माऽर्धेन वै द्विजः ।
प्रतीकाराय सक्रोधः ततः वैश्रवणस्य वै ॥ १४ ॥
पितामहस्तु प्रीतात्मा ददौ वैश्रवणस्य ह ।

अमरत्वं धनेशत्वं लोकपालत्वमेव च ॥ १५ ॥
ईशानेन तथा सख्यं पुत्रं च नलकूबरं ।
राजधानी निवेशं च लंकां रक्षोगणान्वितां ॥१६॥
विमानं पुष्पकं नाम कामगं च ददौ प्रभूः ।
यक्षाणां आधिपत्यं च राजराजत्वमेव च ॥ १७ ॥

॥ इति २७४ अध्यायः ॥

विश्रवा ऋषीच्या सेवेस कुबेरानें पुष्पोत्कटा, राका व मालिनी या तीन राक्षसी दिल्या, त्यांस अनुक्रमें कुंभकर्ण, दशग्रीव, बिभीषण, व खर आणि शूर्पणखा अशीं मुलें झालीं. एकदां कुबेराचें ऐश्वर्य पाहून त्यांस वाईट वाटलें व त्यांनीं तपश्चर्येस आरंभ केला. त्यास एक हजार वर्षें झाल्यावर ब्रह्मदेव संतुष्ट झाले व त्यांनीं प्रत्येकानें मागितलेले वर दिले. रावणानें मनुष्याशिवाय सर्व प्राण्यांपासून अवध्यत्व, कुंभकर्णानें निद्रा व बिभीषणानें धर्मश्रद्धा असे वर मागितले. हे वर प्राप्त झाल्यावर रावणानें कुबेरास लंकेंतून हांकून देऊन त्याचें पुष्पक विमान हरण केलें. ते समयीं कुबेरानें त्यास शाप दिला कीं तुझा लवकर नाश होऊन तुझ्या शत्रूकडे पुष्पकविमान जाईल. बिभीषणाच्या सद्वर्तनानें संतुष्ट होऊन यक्षराक्षससेनांचें आधिपत्य कुबेरानें त्यास

दिलें. (वन. अ. २७५). नंतर कांहीं दिवसांनीं सर्व देव ब्रह्मदेवाकडे जाऊन त्यास ह्मणाले कीं रावण आह्मांस फार त्रास देत आहे, त्यापासून आमचें रक्षण करा. ब्रह्मदेव ह्मणाले त्याचे नाशार्थ विष्णूंनीं पृथ्वीवर अवतार धारण केला आहे; तुह्मीही रामाचे सहाय्य करण्याकरतां ऋक्ष व वानर कुलांत अवतार घ्या. दुंदुभी नांवाच्या गंधर्वास्त्रियेस ते ह्मणाले, तूं मंथरा होऊन देवांचें कार्य कर. ब्रह्मदेवांच्या या आज्ञेप्रमाणें सर्व देव आपल्या अंशानें पृथ्वीवर अवतीर्ण झाले. (वन. २७६).

पुलस्त्यस्य तु यः क्रोधात् अर्धदेहोऽभवत् मुनिः ।
विश्रवा नाम सक्रोधः स वैश्रवणमैक्षत ॥१॥
बुबुधे तं तु सक्रोधं पितरं राक्षसेश्वरः ।
कुबेरः तत्प्रसादार्थं यतते स्म सदा नृप ॥ २ ॥
स राजराजः लंकायां न्यवसत् नरवाहनः ।
राक्षसीः प्रददौ तिस्रः पितुर्वै परिचारिकाः ॥३ ॥
ताः सदा तं महात्मानं संतोषयितुमुद्यताः ।
ऋषिं भरतशार्दूल नृत्यगीतविशारदाः ॥ ४ ॥
उ. ५-४०। पुष्पोत्कटा च राका च मालिनी च विशांपते ।
अन्योन्यस्पर्धया राजन् श्रेयस्कामाः सुमध्यमाः॥५॥
स तासां भगवान् तुष्टः महात्मा प्रददौ वरान् ।

लोकपालोपमान् पुत्रान् एकैकस्याः यथेप्सितान्॥६॥
पुष्पोत्कटायां जज्ञाते द्वौ पुत्रौ राक्षसेश्वरौ ।
कुंभकर्णदशग्रीवौ बलेनाप्रतिमौ भुवि ॥ ७ ॥
मालिनी जनयामास पुत्रं एकं विभीषणं ।
राकायां मिथुनं जज्ञे खरः शूर्पणखा तथा ॥ ८ ॥
विभीषणस्तु रूपेण सर्वेभ्योऽभ्यधिकोऽभवत् ।
स बभूव महाभागः धर्मगोप्ता क्रियारतिः ॥ ९ ॥
दशग्रीवस्तु सर्वेषां श्रेष्टः राक्षसपुंगवः ।
महोत्साहः महावीर्यः महासत्वपराक्रमः ॥ १० ॥
कुंभकर्णः बलेनासीत् सर्वेभ्योऽभ्यधिकः युधि ।
मायावी रणशौंडश्च रौद्रश्च रजनीचरः ॥ ११ ॥
खरः धनुषि विक्रांतः ब्रह्मद्विट् पिशिताशनः ।
सिद्धविघ्नकरी चापि रौद्री शूर्पणखा तदा ॥ १२ ॥
सर्वे वेदविदः शूराः सर्वे सुचरितव्रताः ।
उषुः पित्रा सहरताः गंधमादनपर्वते ॥ १३ ॥
ततः वैश्रवणं तत्र ददृशुः नरवाहनं ।
पित्रा सार्धं समासीनं ऋद्ध्या परमया युतं ॥ १४ ॥
जातामर्षाः ततः ते तु तपसे धृतनिश्चयाः ।
ब्रह्माणं तोषयामासुः घोरेण तपसा तदा ॥ १५ ॥
अतिष्टत् एकपादेन सहस्रं परिवत्सरान् ।

वायुभक्षः दशग्रीवः पंचाग्निः सुसमाहितः ॥ १६ ॥
अधःशायी कुंभकर्णः यताहारः यतव्रतः ।
विभीषणः शीर्णपर्ण एकं अभ्यवहारयन् ॥ १७ ॥
उपवासरतिः धीमान् सदा जप्यपरायणः ।
तमेव कालं आतिष्ठत् तीव्रं तप उदारधीः ॥ १८ ॥
खरशूर्पणखा चैव तेषां वै तप्यतां तपः ।
परिचर्यां च रक्षां च चक्रतुः हृष्टमानसौ ॥ १९ ॥
उ. १०-१० । पूर्णे वर्षसहस्रे तु शिरः छित्वा दशाननः ।
जुहोत्यग्नौ दुराधर्षः तेनातुष्यत् जगत्प्रभुः ॥ २० ॥
ततः ब्रह्मा स्वयं गत्वा तपसस्तान् न्यवारयत् ।
प्रलोभ्य वरदानेन सर्वानेव पृथक् पृथक् ॥ २१ ॥
ब्रा।उ. १०-१३। प्रीतोस्मि वः निवर्तध्वं वरान् वृणुत पुत्रकाः।
यद्यदिष्टं ऋतेत्वेकं अमरत्वं तथास्तु तत् ॥ २२ ॥
यद्यदग्नौ हुतं सर्वं शिरस्ते महदीप्सया ।
उ. १०-२४ । तथैव तानि ते देहे भविष्यंति यथेप्सया ॥२३॥
वैरूप्यं च न ते देहे कामरूपधरः तथा ।
भविष्यसि रणेऽरीणां विजेता न च संशयः ॥ २४ ॥
रावणः । गंधर्वदेवासुरतः यक्षराक्षसतस्तथा ।
सर्पकिन्नरभूतेभ्यः न मे भूयात् पराभवः ॥ २५ ॥
ब्रह्मा । य एते कीर्तिताः सर्वे न तेभ्योऽस्ति भयं तव ।

ऋते मनुष्यात् भद्रं ते तथा तद् विहितं मया ॥२६॥
मार्कंडेयः । एवमुक्तः दशग्रीवः तुष्टः समभवत्तदा ।
अवमेने हि दुर्बुद्धिः मनुष्यान् पुरुषादकः ॥ २७ ॥
कुंभकर्णं अथोवाच तथैव प्रपितामहः ।
स वव्रे महतीं निद्रां तमसा ग्रस्तचेतनः ॥ २८ ॥
उ. १०-२९ । तथा भविष्यतीत्युक्त्वा विभीषणमुवाच ह ।
वरं वृणीष्व पुत्र त्वं प्रीतोऽस्मीति पुनः पुनः ॥२९॥
वि। उ. ११-३० । परमापद्गतस्यापि नाधर्मे मे मतिर्भवेत्।
अशिक्षितं च भगवन् ब्रह्मास्त्रं प्रतिभातु मे ॥ ३० ॥
ब्र । उ १०-३० । यस्मात् राक्षसयोनौ ते जातस्यामित्रकर्शन ।
नाधर्मे धीयते बुद्धिः अमरत्वं ददानि ते ॥ ३१ ॥
मार्कं.। राक्षसस्तु वरं लब्ध्वा दशग्रीवः विशांपते।
लंकायाः चावयामास युधि जित्वा धनेश्वरम्॥३२॥
हित्वा स भगवान् लंकां आविशत् गंधमादनं ।
गंधर्वयक्षानुगतः रक्षःकिंपुरुषैः सह ॥ ३३ ॥
विमानं पुष्पकं तस्य जहाराक्रम्य रावणः ।
शशाप तं वैश्रवणः न त्वां एतत् वहिष्यति ॥३४॥
यस्तु त्वां समरे हंता तमेवैतत् वहिष्यति ।
अवमन्य गुरुं मां च क्षिप्रं त्वं न भविष्यसि॥३५॥
विभीषणस्तु धर्मात्मा सतां मार्गं अनुस्मरन् ।

अन्वगच्छत् महाराज श्रिया परमया युतः ॥ ३६ ॥
तस्मै स भगवान् तुष्टः भ्राता भ्रात्रे धनेश्वरः ।
सेनापत्यं ददौ धीमान् यक्षराक्षससेनयोः ॥ ३७ ॥
राक्षसाः पुरुषादाश्च पिशाचाश्च महाबलाः ।
सर्वे समेत्य राजानं अभ्यषिंचन् दशाननं ॥ ३८ ॥
दशग्रीवश्च दैत्यानां देवानांच बलोत्कटः ।
आक्रम्य रत्नान्यहरत् कामरूपी विहंगमः ॥ ३९ ॥
रावयामास लोकान् यत् तस्मात् रावण उच्यते ।
दशग्रीवः कामबलः देवानां भयमादधत् ॥ ४० ॥

॥ इति २७५ अध्यायः ॥

मार्कं । ततः ब्रह्मर्षयः सर्वे सिद्धाः देवर्षयः तथा ।
हव्यवाहं पुरस्कृत्य ब्रह्माणं शरणं गताः ॥ १ ॥
अग्निः । योसौ विश्रवसः पुत्रः दशग्रीवः महाबलः ।
अवध्यः वरदानेन कृतः भगवता पुरा ॥ २ ॥
स बाधते प्रजाः सर्वाः विप्रकारैः महाबलः ।
ततः नः त्रातु भगवान् नान्यः त्राता हि विद्यते ॥३॥
ब्रह्मा । न स देवासुरैः शक्यः युद्धे जेतुं विभावसो ।
विहितं तत्र यत् कार्यं अभितः तस्य निग्रहः ॥ ४ ॥
तदर्थं अवतीर्णोसौ मन्नियोगात् चतुर्भुजः ।
विष्णुः प्रहरतां श्रेष्ठः स तत्कर्म करिष्यति ॥ ५ ॥

मार्कं. । पितामहः ततस्तेषां संनिधौ शक्रमब्रवीत् ।
सर्वैः देवगणैः सार्धं संभव त्वं महीतले ॥ ६ ॥
बा. १७-२ । विष्णोः सहायान् ऋक्षीषु वानरीषु सर्वशः ।
जनयध्वं सुतान् वीरान् कामरूपबलान्वितान् ॥ ७ ॥
ततः भागानुभागेन देवगंधर्वदानवाः ।
अवतर्तुं महीं सर्वे मंत्रयामासुरंजसा ॥ ८
तेषां समक्षं गंधर्वीं दुंदुर्भीं नाम नामतः ।
शशास वरदः देवः गच्छ कार्यार्थसिद्धये ॥ ९ ॥
पितामहवचः श्रुत्वा गंधर्वी दुंदुभी ततः ।
मंथरा मानुषे लोके कुब्जा समभवत् तदा ॥ १० ॥
शक्रप्रभृतयश्चैव सर्वे ते सुरसत्तमाः ।
बा० १७-८ । वानरर्क्षवरस्त्रीषु जनयामासुरात्मजान् ॥ ११ ॥
तेन्ववर्तन् पितॄन् सर्वे यशसा च बलेन च ।
भेत्तारः गिरिशृंगाणां सालतालशिलायुधाः ॥ १२ ॥
वज्रसंहननाः सर्वे सर्वे चौघबलास्तथा ।
कामवीर्यबलाश्चैव सर्वे युद्धविशारदाः ॥ १३ ॥
नागायुतसमप्राणाः वायुवेगसमाः जवे ॥
यत्रेच्छकानिवासाश्च केचित् अत्र वनौकसः ॥ १४ ॥
एवं विधाय तत् सर्वं भगवान् लोकभावनः ॥
मंथरां बोधयामास यद्यत् कार्यं यथा यथा ॥ १५ ॥

सा तद्वचः समाज्ञाय तथा चक्रे मनोजवा ॥
इतश्चेतश्च गच्छंती वैरसंधुक्षणे रता ॥ १६ ॥

॥ इति २७६ अध्यायः ॥

आपले पुत्र विद्यासंपन्न झालेले पाहून दशरथास परमानंद झाला व रामास यौवराज्य देण्याचा त्यानें विचार केला. ही बातमी मंथरेस कळल्याबरोबर ती कैकेयीच्या महालांत गेली व तिला म्हणाली रामास अभिषेक झाल्यावर तुला कोणी विचारणार नाहीं, म्हणून तूं स्वस्थ बसूं नको. हें ऐकून ती दशरथाकडे गेली व म्हणाली कीं मला जो आपण वर दिला आहे तो आज द्या. तो म्हणाला माग, मी देण्यास तयार आहें. तेव्हां कैकेयी म्हणाली भरतास अभिषेक करून रामास वनवासास पाठवा. हें दारुण वाक्य ऐकून दशरथ कांहीं बोलला नाहीं, तरी त्याचें वचन सत्य करण्याकरतां राम वनांत गेले व रामाच्या वियोगानें दशरथ मृत्यु पावला. मग कैकेयीनें भरतास बोलावून आणलें व त्यास म्हणाली आतां तूं सुखानें राज्य कर. हें ऐकून भरतास फार दुःख झालें व तिची निर्भर्त्सना करून पौरजानपदासह रामास परत आणण्याकरतां चित्रकूटास गेला व राम परत आले

नाहींत म्हणून नंदिग्रामीं राहिला. चित्रकूटाहून राम दंडकारण्यांत गेले. तेथें खरदूषणांस मारून त्यांनीं शूर्पणखेचें नाक कापलें. तेव्हां ती रावणाकडे गेली व त्यास झालेली सर्व हकीगत सांगितली. ती ऐकून तो रागानें सिंहासनावरून उठला व शूर्पणखेच्या शत्रूचा सूड घेण्याकरतां लंकेंतून निघून मारीचाचे आश्रमांत आला. (वन॰ अ. २७७).

युधि. । उक्तं भगवता जन्म रामादीनां पृथक् पृथक् ।
प्रस्थानकारणं ब्रह्मन् श्रोतुं इच्छामि कथ्यतां ॥१॥
कथं दाशरथी वीरौ भ्रातरौ रामलक्ष्मणौ ।
संप्रस्थितौ वने ब्रह्मन् मैथिली च यशस्विनी ॥२॥
मार्कं. । जातपुत्रः दशरथः प्रीतिमान् अभवन्नृप ।
क्रियारतिः धर्मरतः सततं वृद्धसेविता ॥ ३ ॥
क्रमेण चास्य ते पुत्राः व्यवर्धंत महौजसः ।
वेदेषु सरहस्येषु धनुर्वेदेषु पारगाः ॥ ४ ॥
चरितब्रह्मचर्यास्ते कृतदाराश्च पार्थिव ॥
यदा तदा दशरथः प्रीतिमान् अभवत् सुखी ॥ ५ ॥
ज्येष्ठः रामोऽभवत्तेषां रमयामास हि प्रजाः ।
मनोहरतया धीमान् पितुः हृदयनंदनः ॥ ६ ॥
ततः स राजा मतिमान् मत्वात्मानं वयोधिकं ।

मंत्रयामास सचिवैः धर्मज्ञैश्च पुरोहितः ॥ ७ ॥
अभिषेकाय रामस्य यौवराज्येन भारत ।
प्राप्तकाळं च ते सर्वे मेनिरे मंत्रिसत्तमाः ॥ ८ ॥
लोहिताक्षं महाबाहुं मत्तमातंगगामिनं ॥
दीर्घबाहुं महोरस्कं नीलकुंचितमूर्धजं ॥ ९ ॥
दीप्यमानं श्रिया वीरं शक्रात् अनवरं रणे ।
पारगं सर्वधर्माणां बृहस्पतिसमं मतौ ॥ १० ॥
सर्वानुरक्तप्रकृतिं सर्वविद्याविशारदं ।
जितेंद्रियं अमित्राणां अपि दृष्टिमनोहरम् ॥ ११ ॥
नियंतारं असाधूनां गोप्तारं धर्मचारिणां ।
धृतिमंतं अनाधृष्यं जेतारं अपराजितं ॥ १२ ॥
बा. १-१७ । पुत्रं राजा दशरथः कौसल्यानंदिवर्धनं ।
संदृश्य परमां प्रीतिं अगच्छत् कुरुनंदन ॥ १३ ॥
चिंतयंश्च महातेजा गुणान् रामस्य वीर्यवान् ।
अभ्यभाषत भद्रं ते प्रीयमाणः पुरोहितं ॥ १४ ॥
अद्य पुष्यः निशि ब्रह्मन् पुण्यं योगं उपैष्यति ।
बा० ८-११ । संभाराःसंभ्रियंतां मे रामश्चोपनिमंत्र्यतां ॥१५॥
इति तत् राजवचनं प्रतिश्रुत्याथ मंथरा ।
कैकेयीं अभिगम्येदं काले वचनमब्रवीत् ॥ १६ ॥
अद्य कैकेयि दौर्भाग्यं राज्ञा ते ख्यापितं महत् ।

अयो० ७-२७ । आशीविषस्त्वां संक्रुद्धश्चंडः दशतु दुर्भगे ।१७
अयो. ८-९ । सुभगा खलु कौसल्या यस्याः पुत्रोऽभिषेक्ष्यते ।
कुतः हि तव सौभाग्यं यस्याः पुत्रः न राज्यभाक्॥१८
सा तत् वचनमाज्ञाय सर्वाभरणभूषिता ।
वेदीविलग्नमध्येव बिभ्रती रूपमुत्तमं ॥ १९ ॥
विविक्ते पतिमासाद्य हसंतीव शुचिस्मिता ।
प्रणयं व्यंजयंतीव मधुरं वाक्यमब्रवीत् ॥ २० ॥
सत्यप्रतिज्ञ यन्मे त्वं कामं एकं निसृष्टवान् ।
उपाकुरुष्व तत् राजन् तस्मात् मुंचस्व संकटात् ॥२१॥
राजा। वरं ददानि ते हंत तत् गृहाण यदिच्छसि ।
अयो०१० । अवध्यः वध्यतां कोद्य वध्यः कोद्यविमुच्यतां ॥२२
धनं ददानि कस्याद्य ह्रियतां कस्य वा पुनः ।
ब्राह्मणस्वात् इहान्यत्र यत्किंचित् वित्तमस्ति मे॥२३
पृथिव्यां राजराजोस्मि चातुर्वर्ण्यस्य रक्षिता ।
यस्तेऽभिलाषितः कामः ब्रूहि कल्याणि मा चिरं॥२४
सा तत् वचनमाज्ञाय परिगृह्य नराधिपं ।
आत्मनः बलमाज्ञाय तत एनं उवाच ह ॥ २५ ॥
अभिषेचनिकं यत्ते रामार्थं उपकल्पितं ।
भरतः तत् अवाप्नोतु वनं गच्छतु राघवः ॥ २६ ॥
स तत् राजा वचः श्रुत्वा विप्रियं दारुणोदयं ।

दुःखार्तः भरतश्रेष्ठ न किंचित् व्याजहार ह ॥२७॥
ततः तथोक्तं पितरं रामः विज्ञाय वीर्यवान् ।
वनं प्रतस्थे धर्मात्मा राजा सत्यः भवत्विति ॥२८॥
तं अन्वगच्छत् लक्ष्मीवान् धनुष्मान् लक्ष्मणस्तदा ।
बा. १-३२ । सीता च भार्या भद्रं ते वैदेही जनकात्मजा २९
बा. १-३३ । ततः वनं गते रामे राजा दशरथः तदा ।
समयुज्यत देहस्य कालपर्याय धर्मणा ॥ ३० ॥
रामं तु गतमाज्ञाय राजानं च तथागतं ।
आनाय्य भरतं देवी कैकेयी वाक्यमब्रवीत् ॥३१॥
गतः दशरथः स्वर्गं वनस्थौ रामलक्ष्मणौ ।
गृहाण राज्यं विपुलं क्षेमं निहतकंटकं ॥ ३२ ॥
तां उवाच स धर्मात्मा नृशंसं बत ते कृतं ।
पतिं हत्वा कुलं चेदं उत्साद्य धनलुब्धया ॥३३॥
अयशः पातयित्वा मे मूर्ध्नि त्वं कुलपांसने ।
सकामा भव मे मातः इत्युक्त्वा प्ररुरोद ह ॥ ३४ ॥
स चारित्र्यं विशोध्याथ सर्वप्रकृतिसंनिधौ ।
अन्वयात् भ्रातरं रामं विनिवर्तनलालसः ॥ ३५ ॥
कौसल्यां च सुमित्रां च कैकेयीं च सुदुःखितः ।
अग्रे प्रस्थाप्य यानैः स शत्रुघ्नसहितः ययौ ॥ ३६ ॥
वसिष्ठवामदेवाभ्यां विप्रैश्चान्यैः सहस्रशः ।

पौरजानपदैः सार्धं रामानुयनकांक्षया ॥ ३७ ॥
ददर्श चित्रकूटस्थं स रामं सहलक्ष्मणं ।
तापसानां अलंकारं धारयंत धनुर्धरं ॥ ३८ ॥
विसर्जितः स रामेण पितुर्वचनकारिणा ।
बा. १-३९ । नंदिग्रामेऽकरोत् राज्यं पुरस्कृत्यास्य पादुके ३९
बा. १-४० । रामस्तु पुनराशंक्य पौरजानपदागमं ।
प्रविवेश महारण्यं शरभंगाश्रमं प्रति ॥ ४० ॥
सत्कृत्य शरभंगं स दंडकारण्यमाश्रितः ।
नदीं गोदावरीं रम्यां आश्रित्य न्यवसत् तदा ॥४१॥
बा. १-४३ । वसतः तस्य रामस्य ततः शूर्पणखाकृतं ।
खरेणासीत् महद्वैरं जनस्थाननिवासिना ॥ ४२ ॥
रक्षार्थं तापसानां तु राघवः धर्मवत्सलः ।
बा. १-४९ । चतुर्दशसहस्राणि जघान भुवि राक्षसान् ॥४३॥
बा. १-४७ । दूषणं च खरं चैव निहत्य सुमहाबलौ ।
चक्रे क्षेमं पुनः धीमान् धर्मारण्यं स राघवः ॥४४॥
हतेषु तेषु रक्षःसु ततः शूर्पणखा पुनः ।
ययौ निकृत्तनासोष्ठी लंकां भ्रातुः निवेशनं ॥ ४५ ॥
ततः रावणमभ्येत्य राक्षसी दुःखमूर्छिता ।
पपात पादयोः भ्रातुः संशुष्करुधिरानना ॥ ४६॥
बा. १-४९ । तां तथा विकृतां दृष्ट्वा रावणः क्रोधमूर्छितः ।

उत्पपातासनात् क्रुद्धः दंतैः दंतान् उपस्पृशन् ॥४७॥
स्वान् अमात्यान् विसृज्याथ विविक्ते तां उवाच तः
केनाप्येवं कृता भद्रे मां अचिंत्यावमन्य च ॥ ४८ ॥
कः शूलं तीक्ष्णमासाद्य सर्वगात्रैः निषेवते ।
कः शिरस्याग्निमाधाय विश्वस्तः स्वपते सुखं ॥४९॥
आशीविषं घोरतरं पादेन स्पृशतीह कः ॥
सिंहं केसरिणं कश्च दंष्ट्रायां स्पृश्य तिष्ठति ॥ ५० ॥
इत्येवं ब्रुवतः तस्य स्रोतेभ्यः तेजसोऽर्चिषः ।
निश्चेरुः दह्यतः रात्रौ वृक्षस्येव स्वरंध्रतः ॥ ५१ ॥
तस्य तत् सर्वमाचख्यौ भगिनी रामविक्रमं ।
खरदूषणसंयुक्तं राक्षसानां पराभवं ॥ ५२ ॥
स निश्चित्य ततः कृत्यं स्वसारं उपसांत्व्य च ।
ऊर्ध्वं आचक्रमे राजा विधाय नगरे विधिं ॥ ५३ ॥
त्रिकूटं समतिक्रम्य कालपर्वतमेव च ।
ददर्श मकरावासं गंभीरोदं महोदधिं ॥ ५४ ॥
तं अतीत्याथ गोकर्णं अभ्यगच्छत् दशाननः ।
दयितं स्थानमव्यग्रं शूलपाणेः महात्मनः ॥ ५५ ॥
तत्राभ्यगच्छत् मारीचं पूर्वामात्यं दशाननः ।
पुरा रामभयात् एव तापस्यं समुपाश्रितं ॥ ५६ ॥

॥ इति २७७ अध्यायः ॥

रावणाचा आदरसत्कार केल्यावर इतक्या लांब येण्याचें कारण काय असें मारीचानें पुसलें, तेव्हां रामांनीं १४ हजार राक्षस जनस्थानांत मारले सबब त्याचा सूड घेण्यास मला सहाय्य कर असें रावण ह्मणाला. रामानें राक्षसांचा नाश केला हें वर्तमान ऐकून मारीच घाबरला व रावणास म्हणाला मला रामाचा पराक्रम ठाऊक आहे, तूं त्याचे वाटेस जाऊं नको. रावण म्हणाला माझें जर तूं ऐकणार नाहींस तर मीच तुला ठार मारीन; तेव्हां साधूचें हातानें मरणें बरें वाटून मारीचानें सुवर्णमृगाचें रूप धारण केलें व रामास आश्रमापासून दूर नेलें. मरतांना रामासारख्या आवाजानें त्यानें ! हे लक्ष्मणा ! अशी त्यानें हांक मारली, ती ऐकून सीता रामाकडे धांवूं लागली. तेव्हां लक्ष्मण म्हणाला तूं रामाविषयीं काळजी करूं नकोस. तेव्हां आपल्याविषयीं याचे मनांत पापवासना उत्पन्न झाली असें समजून सीतेनें त्याची निंदा केली. ती सहन न होऊन लक्ष्मण आश्रमांतून निघून गेला. नंतर रावण आश्रमांत येऊन सीतेस म्हणाला तूं माझी स्त्री हो. तें ऐकून सीतेस राग आला, व तिनें रावणाची पुष्कळ निर्भर्त्सना केली, तरी तिजकडे दुर्लक्ष करून रावण तिला

उचलून घेऊन गेला व नेतांना तो जटायूचे दृष्टीस पडला. ( वन. अ. २७८ ).

मा. । मारीचस्त्वथ संभ्रांतः दृष्ट्वा रावणमागतं ।
पूजयामास सत्कारैः फलमूलादिभिस्ततः ॥ १ ॥
विश्रांतं तेनमासीनं अन्वासीनः स राक्षसः ।
उवाच प्रसृतं वाक्यं वाक्यज्ञः वाक्यकोविदं ॥ २ ॥
न ते प्रकृतिमान् वर्णः कच्चित् क्षेमं पुरे तव ।
कच्चित् प्रकृतयः सर्वाः भजंते त्वां यथा पुरा ॥ ३ ॥
किं इहागमने चापि कार्यं ते राक्षसेश्वर ।
कृतमित्येव तत् विद्धि यद्यपि स्यात् सुदुष्करं ॥
शशंस रावणस्तस्मै तत् सर्वं रामचेष्टितं । ॥
समासेनैव कार्याणि क्रोधामर्षसमन्वितः ॥ ५ ॥
मारीचस्त्वब्रवीत् श्रुत्वा समासेनैव रावणं ।
अलं ते राममासाद्य वीर्यज्ञः ह्यस्मि तस्य वै ॥ ६
बाणवेगं हि कस्तस्य शक्तः सोढुं महात्मनः ।
प्रवृज्यायां हि मे हेतुः स एव पुरुषर्षभ ॥ ७ ॥
विनाशमुखं एतत्ते केनाख्यातं दुरात्मना ।
तं उवाचाथ सक्रोधः रावणः परिभर्त्सयन् ॥ ८ ॥
अकुर्वतोऽस्मद्वचनं स्यान्मृत्युरपि ते ध्रुवं ।
मारीचः चिंतयामास विशिष्टात् मरणं वरं ॥ ९ ॥

अवश्यं मरणे प्राप्ते करिष्याम्यस्य यन्मतं ।
ततस्तं प्रत्युवाचाथ मारीचः रक्षसां वरं ॥ १० ॥
अर. ३६-१८। किं ते साह्यं मया कार्यं करिष्याम्यवशोपि तत्।
तमब्रवीत् दशग्रीवः गच्छ सीतां प्रलोभय ॥ ११ ॥
अर. ३६-१८। रत्नशृंगः मृगः भूत्वा रत्नचित्रतनूरुहः ।
ध्रुवं सीता समालक्ष्य त्वां रामं चोदयिष्यति ॥१२॥
अपक्रांते च काकुत्स्थे सीता वश्या भविष्यति ।
तां आदायापनेष्यामि ततः स न भविष्यति ॥१३ ॥
भार्यावियोगात् दुर्बुद्धेः एतत् साह्यं कुरुष्व मे ।
इत्येवमुक्तः मारीचः कृत्वोदकमथात्मनः ॥ १४ ॥
रावणं पुरतो यांतं अन्वगच्छत् सुदुःखितः ।
ततः तस्याश्रमं गत्वा रामस्याक्लिष्टकर्मणः ॥१५॥
चक्रतुः तत् यथा सर्वं उभौ यत् पूर्वमंत्रितं ।
रावणस्तु यतिर्भूत्वा मुंडः कुंडी त्रिदंडधृत् ॥ १६ ॥
मृगश्च भूत्वा मारीचः तं देशं उपजग्मतुः ।
दर्शयामास मारीचः वैदेहीं मृगरूपधृत् ॥ १७ ॥
चोदयामास तस्यार्थे सा रामं विधिचोदिता ।
रामः तस्याः प्रियं कुर्वन् धनुरादाय सत्वरः ॥१८॥
रक्षार्थे लक्ष्मणं न्यस्य प्रययौ मृगलिप्सया ।
स धन्वी बद्धतूणीरः खड्गगोधांगुलित्रवान् ॥ १९॥

अन्वधावत् मृगं रामः रुद्रः तारामृगं यथा ।
सोऽतर्हितः पुनः तस्य दर्शनं राक्षसोव्रजन् ॥ २० ॥
चकर्ष महदध्वानं रामस्तं बुबुधे ततः।
निशाचरं विदित्वा तं राघवः प्रतिभानवान् ॥ २१ ॥
अमोघं शरमादाय जघान मृगरूपिणं ।
स रामबाणाभिहतः कृत्वा रामस्वरं तदा ॥ २२ ॥
अर ४४-२४ । हा सीते लक्ष्मणेत्येवं चुक्रोशार्तस्वरेण ह ।
शुश्राव तस्य वैदेही ततस्तां करुणां गिरं ॥ २३ ॥
सा प्राद्रवत् यतः शब्दः तां उवाचाथ लक्ष्मणः ।
अलं ते शंकया भीरु कः रामं प्रहारिष्यति ॥ २४ ॥
मुहूर्तात् द्रक्षसे रामं भर्तारं त्वं शुचिस्मिते ।
इत्युक्ता सा प्ररुदती पर्यशंकत लक्ष्मणं ॥ २५ ॥
हता वै स्त्रीस्वभावेन शुक्लचारित्रभूषणा ।
सा तं परुषमारब्धा वक्तुं साध्वी पतिव्रता ॥ २६ ॥
नैष कामः भवेत् मूढ यं त्वं प्रार्थयसे हृदा ।
अप्यहं शस्त्रमादाय हन्यां आत्मानमात्मना ॥२७॥
पतेयं गिरिशृंगात् वा विशेयं वा हुताशनं ।
रामं भर्तारमुत्सृज्य न त्वहं त्वां कथंचन ॥ २८ ॥
निर्हीनं उपतिष्ठेयं शार्दूली क्रोष्टुकं यथा ।
एतादृशं वचः श्रुत्वा लक्ष्मणः प्रियराघवः ॥ २९ ॥

पिधाय कर्णौ सद्वृत्तः प्रस्थितः येन राघवः ।
स रामस्य पदं गृह्य प्रससार धनुर्धरः ॥ ३० ॥
नंतर रावणानें आपल्या शरीरापासून हजारों राक्षस व मायेचे रामलक्ष्मण उत्पन्न केले, त्यांचा रामांनीं दिव्यास्त्रानें नाश केला. इतक्यांत इंद्राचा रथ घेऊन मातली रामाकडे आला, त्यांत बसून राम रावणाशीं युद्ध करूं लागले. रावणानें हजारों बाण व शेंकडों आयुधें रामावर टाकलीं; त्यांचा नाश करून रामांनीं दिव्य बाण भात्यांतून काढून त्यावर ब्रह्मास्त्राची योजना करून तो रावणावर सोडला. तो लागल्याबरोबर रावणाचा देह पेटून पंचमहाभूतें वेगळीं होऊन आपापल्या ठायीं मिळालीं व म्हणून युद्धभूमीवर रावणाची चिमूटभर सुद्धां राख उरली नाहीं. ( वन. अ. २९० ).

मार्कं.। ततः क्रुद्धः दशग्रीवः प्रिये पुत्रे निपातिते।
निर्ययौ रथमास्थाय हेमरत्नविभूषितं ॥ १ ॥
स वृतः राक्षसैः घोरैः विविधायुधपाणिभिः।
अभिदुद्राव रामं स योधयन् हरियूथपान् ॥ २ ॥
तं आद्रवंतं संक्रुद्धं मैंदनीलनलांगदाः।
हनूमान् जांबवान् चैव ससैन्याः पर्यवारयन् ॥३॥
ते दशग्रीवसैन्यं तत् ऋक्षवानरपुंगवाः।
द्रुमैः विध्वंसयां चक्रुः दशग्रीवस्य पश्यतः ॥ ४ ॥
ततः स सैन्यं आलोक्य वध्यमानं अरातिभिः।

मायावी चासृजत् मायां रावणः राक्षसाधिपः ॥५॥

तस्य देहविनिष्क्रांताः शतशोथ सहस्रशः ।
राक्षसाः प्रत्यदृश्यंत शरशक्त्यर्ष्टिपाणयः ॥ ६ ॥

तान् रामः जघ्निवान् सर्वान् दिव्येनास्त्रेण राक्षसान्
अथ भूयोपि मायां स व्यदधात् राक्षसाधिपः ॥ ७ ॥

कृत्वा रामस्य रूपाणि लक्ष्मणस्य च भारत ।
अभिदुद्राव रामं च लक्ष्मणं च दशाननः ॥ ८ ॥

ततः ते राममर्च्छंतः लक्ष्मणं च क्षपाचराः ।
अभिपेतुः तदा रामं प्रगृहीतशरासनाः ॥ ९ ॥

तां दृष्ट्वा राक्षसेंद्रस्य मायां इक्ष्वाकुनंदनः ।
उवाच रामं सौमित्रिः असंभ्रांतः बृहद्वचः ॥ १० ॥

जहीमान् राक्षसान् पापान् आत्मनः प्रतिरूपकान् ।
जघान रामः तान् चान्यान् आत्मनः प्रतिरूपकान्॥

ततः हर्यश्वयुक्तेन रथेनादित्यवर्चसा ।
उपतस्थे रणे रामं मातलिः शक्रसारथिः ॥ १२ ॥

मातलीः। अयं हर्यश्वयुक् जैत्रः मघोनः स्यंदनोत्तमः।
अनेन शक्रः काकुत्स्थ समरे दैत्यदानवान् ॥१३॥
शतशः पुरुषव्याघ्र रथोदारेण जघ्निवान् ।

तदनेन नरव्याघ्र मया यत्तेन संयुगे ॥ १४ ॥
स्यंदनेन जहि क्षिप्रं रावणं मा चिरं कृथाः ।
इत्युक्तः राघवः तथ्यं वचोऽशंकत मातलेः ॥ १५ ॥
मायैषा राक्षसस्येति तं उवाच विभीषणः ।
नेयं माया नरव्याघ्र रावणस्य दुरात्मनः ॥ १६ ॥
तत् आतिष्ठ रथं शीघ्रं इमं ऐंद्रं महाद्युते ।
ततः प्रहृष्टः काकुत्स्थः तथेत्युक्त्वा विभीषणं ॥१७॥
रथेनाभिपपाताथ दशग्रीवं रुषान्वितः ।
हाहाकृतानि भूतानि रावणे समभिद्रुते ॥ १८ ॥
सिंहनादाः सपटहाः दिवि दिव्याः तथानदन् ।
दशकंधरराजसून्वोः तथा युद्धं अभूत् महत् ॥१९॥
अलब्धोपममन्यत्र तयोरेव तथाभवत् ।
स रामाय महाघोरं विससर्ज निशाचरः ॥ २० ॥
शूलं इंद्राशनिप्रख्यं ब्रह्मदंडं इवोद्यतं ।
तत् शूलं सत्वरं रामः चिच्छेद निशितैः शरैः॥२१॥
तत् दृष्ट्वा दुष्करं कर्म रावणं भयमाविशत् ।
ततः क्रुद्धन् ससर्जाशु दशग्रीवः शितान् शरान्॥२२
सहस्रायुतशः रामे शस्त्राणि विविधानि च ।
ततः भुशुंडीः शूलानि मुसलानि परश्वधान् ॥ २३ ॥
शक्तीश्च विविधाकाराः शतघ्नीश्च शितान् क्षुरान् ।

तां मायां विकृतां दृष्ट्वा दशग्रीवस्य रक्षसः ॥ २४ ॥
भयात् प्रदुद्रुवुः सर्वे वानराः सर्वतः दिशं ।
ततः सुपत्रं सुमुखं हेमपुंखं शरोत्तमं ॥ २५ ॥
तूणात् आदाय काकुत्स्थः ब्रह्मास्त्रेण युयोज ह ।
तं बाणवर्यं रामेण ब्रह्मास्त्रेणानुमंत्रितं ॥ २६ ॥
जहृषुः देवगंधर्वाः दृष्ट्वा शक्रपुरोगमाः ।
अल्पावशेषं आयुश्च ततोमन्यंत रक्षसः ॥२७॥
ब्रह्मास्त्रोदीरणात् शत्रोः देवदानवकिन्नराः ।
ततः ससर्ज तं रामः शरं अप्रतिमौजसं ॥ २८ ॥
रावणांतकरं घोरं ब्रह्मदंडं इवोद्यतं ।
मुक्तमात्रेण रामेण दूराकृष्टेन भारत ॥२९॥
स तेन राक्षसश्रेष्टः सरथः साश्वसाराथिः ।
प्रजज्वाल महाज्वालेनाग्निनाभिपारिप्लुतः ॥३०॥
ततः प्रहृष्टाः त्रिदशाः सहगंधर्वचारणाः ।
निहतं रावणं दृष्ट्वा रामेणाक्लिष्टकर्मणा ॥३१॥
तत्यजुः तं महाभागं पंचभूतानि रावणं ।
भ्रंशितः सर्वलोकेषु स हि ब्रह्मास्त्रतेजसा ॥३२॥
शरीरधातवः ह्यस्य मांसं रुधिरमेव च ।
नेशुः ब्रह्मास्त्रनिर्दग्धाः न च भस्माप्यदृश्यत ॥ ३३ ॥
॥ इति २९० अध्यायः ॥

रावणास मेलेला पाहून देवांनीं रामाची स्तुती केली व गंधर्वांनीं पुष्पवृष्टी केली. रामांनीं लंकेचें राज्य बिभीषणास दिलें तेव्हां तो लंकेंत गेला व सीतेस घेऊन परत आला. तिला राम म्हणाले कीं शत्रूच्या घरीं राहून वृद्ध होऊं नयेस म्हणून मीं तुला सोडविली, परंतु परगृहीं राहिलेल्या स्त्रीचा धर्मशास्त्राप्रमाणें मला अंगिकार करतां येत नाहीं. हें दारुण वाक्य ऐकून सीतेचें तोंड उतरलें व लक्ष्मणादिकांस फार दुःख झालें. इतक्यांत ब्रह्मादिक देव व दशरथ राजा विमानांत बसून आले. त्यांचे समक्ष सीता प्रतिज्ञा करून ह्मणाली कीं मी जर दुराचारी असेन तर पंचमहाभूतें माझे शरीरास सोडून जावोत. हें सीतेचें भाषण ऐकून वायु, अग्नी, वरुण, ब्रह्मा व दशरथ यांनीं रामास सांगितलें कीं सीता शुद्ध आहे, तिचा तूं अंगिकार कर व अयोध्येचें राज्य कर; आतां तुला काय पाहिजे ते वर माग. रामांनीं धर्मावर श्रद्धा, शत्रूपासून अपराजय व वानरांचें पुनरुज्जीवन हे वर मागितले. त्याप्रमाणें ब्रह्मदेवांनीं वर दिल्यावर मेलेले वानर जिवंत झाले. नंतर सीतेसह पुष्पक विमानांत बसून राम परत निघाले व वानरांची संभावना करून रामांनीं त्यांस निरोप दिला. अंगदास

किष्किंधेचें यौवराज्य दिलें व नंदिग्रामास येऊन राम भरतशत्रुघ्नास भेटले. नंतर सुमुहूर्तावर वसिष्ठ वामदेवांनीं रामास राज्याभिषेक केला. ( वन. अ. २९१ ).

मार्क. । स हत्वा रावणं क्षुद्रं राक्षसेंद्रं सुरद्विषं ।
बभूव हृष्टः ससुहृत् रामः सौमित्रिणा सह ॥ १ ॥
ततः हते दशग्रीवे देवाः सर्षिपुरोगमाः ।
आशीभिः जययुक्ताभिः आनर्चुः तं महाभुजं ॥ २ ॥
रामं कमलपत्राक्षं तुष्टुवुः सर्वदेवताः ।
गंधर्वाः पुष्पवर्षैश्च वाग्भिश्च त्रिदशालयाः॥३॥
पूजयित्वा यथा रामं प्रतिजग्मुः यथागतं ।
तत् महोत्सवसंकाशं आसी आकाशमच्युत ॥ ४ ॥
ततः हत्वा दशग्रीवं लंकां रामः महायशाः ।
विभीषणाय प्रददौ प्रभुः परपुरंजयः ॥५॥
ततः सीतां पुरस्कृत्य विभीषणपुरस्कृतां ।
अविंध्यः नाम सुप्रज्ञः वृद्धामात्यः विनिर्ययौ ॥ ६ ॥
उवाच च महात्मानं काकुत्स्थं दैन्यमास्थितः ।
प्रतीच्छ देवीं सद्वृत्तां महात्मन् जानकीं इति ॥७॥
एतत् श्रुत्वा वचः तस्मात् अवतीर्य रथोत्तमात् ।
बाष्पेणपिहितां सीतां ददर्शेक्ष्वाकुनंदनः ॥ ८ ॥
तां दृष्ट्वा चारुसर्वांगीं यानस्थां शोककर्शितां ।

मलोपचितसर्वांगीं जटिलां कृष्णवाससां ॥ ९ ॥
उवाच रामः वैदेहिं परामर्शविशंकितः ।
गच्छ वैदेहि मुक्ता त्वं यत् कार्यं तत मया कृतं॥१०
मां आसाद्य पतिं भद्रे न त्वं राक्षसवेश्मनि ।
जरां व्रजेथा इति मे निहतोसौ निशाचरः ॥ ११ ॥
कथं ह्यस्मद्विधः जातु जानन् धर्मविनिश्चयं ।
परहस्तगतां नारीं मुहूर्तमपि धारयेत् ॥ १२ ॥
सुवृत्तां असुवृत्तां वाप्यहं त्वां अद्य मैथिलि ॥
नोत्सहे परिभोगाय श्वावलीढं हविः यथा ॥ १३ ॥
ततः सा सहसा बाला तत् श्रुत्वा दारुणं वचः ॥
पपात देवी व्यथिता निकृत्ता कदली यथा ॥ १४ ॥
योप्यस्याः हर्षसंभूतः मुखरागः तदाभवत् ॥
क्षणेन स पुनः नष्टः निश्वास इव दर्पणे ॥ १५ ॥
ततः ते हरयः सर्वे तत् श्रुत्वा रामभाषितं ॥
गतासुकल्पाः निश्चेष्टाः भभूवुः सहलक्ष्मणाः ॥१६॥
ततः देवः विशुद्धात्मा विमानेन चतुर्मुखः ।
पद्मयोनिः जगत्स्रष्टा दर्शयामास राघवं ॥ १७ ॥
शक्रः चाग्निश्च वायुश्च यमः वरुण एव च ।
यक्षाधिपश्च भगवान् तथा सप्तर्षयोऽमलाः ॥ १८ ॥
राजा दशरथश्चैव दिव्यभास्वरमूर्तिमान् ।

विमानेन महार्हेण हंसयुक्तेन भास्वता ॥ १९ ॥
ततोंतरिक्षं तत् सर्वं देवगंधर्वसंकुलं ।
शुशुभे तारकाचित्रं शरदीव नभस्तलं ॥ २० ॥
ततः उत्थाय वैदेही तेषां मध्ये यशस्विनी ।
उवाच वाक्यं कल्याणी रामं पृथुलवक्षसं ॥ २१ ॥
राजपुत्र न ते दोषं करोमि विदिता हि ते ।
गतिः स्त्रीणां नराणां च शृणु चेदं वचः मम ॥ २२॥
अंतश्चरति भूतानां मातरिश्वा सदागतिः ।
स मे विमुंचतु प्राणान् यदि पापं चराम्यहं ॥ २३ ॥
अग्निः आपः तथाकाशं पृथिवी वायुरेव च ।
विमुंचंतु मम प्राणान् यदि पापं चराम्यहं ॥ २४ ॥
यथाहं त्वत् ऋते वीर नान्यं स्वप्नेप्यचिंतयं ।
तथा मे देव निर्दिष्टः त्वमेव हि पतिर्भव ॥ २५ ॥
ततोंतरिक्षे वाक् आसीत् सुभगा लोकसाक्षिणी ।
पुण्या संहर्षणी तेषां वानराणां महात्मनां ॥ २६ ॥
वायुः । भो भो राघव सत्यं वै वायुः अस्मि सदागतिः।
अपापा मैथिली राजन् संगच्छ सह भार्यया ॥२७॥
अग्निः । अहं अंतःशरीरस्थः भूतानां रघुनंदन ।
सुसूक्ष्मं अपि काकुत्स्थ मैथिली नापराध्यति ॥ २८
वरुणः । रसाः वै मत्प्रसूता हि भूतदेहेषु राघव ।

अहं वै त्वां प्रब्रवीमि मैथिली प्रतिगृह्यतां ॥ २९ ॥
ब्रह्मा । पुत्र नैतत् इहाश्चर्यं त्वयि राजर्षिधर्मणि ।
साधो सद्वृत्त काकुत्स्थ शृणु चेदं वचः मम ॥३०॥
शत्रु एष त्वया वीर देवगंधर्वभोगिनां ।
यक्षाणां दानवानां च महर्षीणां च पातितः ॥३१॥
अवध्यः सर्वभूतानां मत्प्रसादात् पुराभवत् ।
कस्माच्चित् कारणात् पापः कंचित् कालं उपेक्षितः ॥
वधार्थं आत्मनः तेन हृता सीता दुरात्मना ।
नलकूबरशापेन रक्षा चास्याः कृता मया ॥ ३३ ॥
यदि ह्यकामां आसेवेत् स्त्रियं अन्यां अपि ध्रुवं ॥
शतधास्य फलेत् मूर्धा इत्युक्तः सोभवत् पुरा ॥३४॥
नात्र शंका त्वया कार्या प्रतीच्छेमां महाद्युते ॥
कृतं त्वया महत्कार्यं देवानां अमरप्रभ ॥ ३५ ॥
दश. । प्रीतोस्मि वत्स भद्रं ते पिता दशरथोस्मि ते॥
अनुजानामि राज्यं च प्रशाधि पुरुषोत्तम ॥ ३६ ॥
रामः । अभिवादये त्वां राजेंद्र यदि त्वं जनकः मम ।
गमिष्यामि पुरीं रम्यां अयोध्यां शासनात् तव ॥
मार्कं. । तमुवाच पिता भूयः प्रहृष्टः भरतर्षभ ।
गच्छायोध्यां प्रशाधीति रामं रक्तांतलोचनं ॥३८॥
संपूर्णानीह वर्षाणि चतुर्दश महाद्युते ॥

ततः देवान् नमस्कृत्य सुहृद्भिः अभिनंदितः ॥३९॥
महेंद्र इव पौलोम्या भार्यया स समेयिवान् ॥
ततः वरं ददौ तस्मै ह्यविंध्याय परंतपः ॥ ४० ॥
त्रिजटां चार्थमानाभ्यां योजयामास राक्षसीं ॥
तं उवाच ततः ब्रह्मा देवैः शक्रपुरोगमैः ॥ ४१ ॥
कौशल्यामातरिष्टान् ते वरान् अद्य ददानि कान् ॥
वव्रे रामः स्थितिं धर्मे शत्रुभिश्चापराजयं ॥ ४२ ॥
राक्षसैः निहतानां च वानराणां समुद्भवं ॥
ततः ते ब्रह्मणा प्रोक्ते तथेति वचने तदा ॥ ४३ ॥
समुत्तस्थुः महाराज वानराः लब्धचेतसः ॥
सीता चापि महाभागा वरं हनुमते ददौ ॥ ४४ ॥
रामकीर्त्या समं पुत्र जीवितं ते भविष्यति ॥
दिव्यास्त्वां उपभोगाश्च मत्प्रसादकृताः सदा ॥४५॥
उपस्थास्यंति हनुमान् इति स्म हरिलोचन ॥
ततः ते प्रेक्षमाणानां तेषां अक्लिष्टकर्मणां ॥ ४६ ॥
अंतर्धानं ययुः देवाः सर्वे शक्रपुरोगमाः ॥
दृष्ट्वा रामं तु जानक्या संगतं शक्रसारथिः ॥ ४७ ॥
उवाच परमप्रीतः सुहृन्मध्ये इदं वचः ॥
देवगंधर्वयक्षाणां मानुषासुरभोगिनां ॥ ४८ ॥
अपनीतं त्वया दुःखं इदं सत्यपराक्रम ॥

सदेवासुरगंधर्वाः यक्षराक्षसपन्नगाः ॥ ४९ ॥
कथयिष्यंति लोकास्त्वां यावत् भूमिः धरिष्यति ॥
इत्येवमुक्त्वानुज्ञाप्य रामं शस्त्रभृतां वरं ॥ ५० ॥
संपूज्यापाक्रमत् तेन रथेनादित्यवर्चसा ॥
ततः सीतां पुरस्कृत्य रामः सौमित्रिणा सह ॥५१॥
सुग्रीवप्रमुखैः चैव सहितः सर्ववानरैः ॥
विधाय रक्षां लंकायां विभीषणपुरस्कृतः ॥ ५२ ॥
स ततार पुनः तेन सेतुना मकरालयं ।
पुष्पकेण विमानेन खेचरेण विराजता ॥ ५३ ॥
कामगेन यथामुख्यैः अमात्यैः संवृतः वशी ।
ततः तीरे समुद्रस्य यत्र शिश्ये स पार्थिवः ॥५४॥
तत्रैवोवास धर्मात्मा सहितः सर्ववानरैः ॥
अथैनान् राघवः काले समानीयाभ्यपूज्य च ॥५५॥
विसर्जयामास तदा रत्नैः संतोष्य सर्वशः ।
गतेषु वानरेंद्रेषु गोपुच्छर्क्षेषु तेषु च ॥ ५६ ॥
सुग्रीवसहितः रामः किष्किंधां पुनरागमत् ।
विभीषणेनानुगतः सुग्रीवसहित तदा ॥ ५७ ॥
पुष्पकेण विमानेन वैदेह्याः दर्शयन् वनं ।
किष्किंधां तु समासाद्य रामः प्रहरतां वरः ॥ ५८ ॥
अंगदं कृतकर्माणं यौवराज्येभ्यषेचयत् ।

ततः तैरेव सहितः रामः सौमित्रिणा सह ॥ ५९ ॥
यथा गतेन मार्गेण प्रययौ स्वपुरं प्रति ।
अयोध्यां स समासाद्य पुरीं राष्ट्रपतिः ततः ॥ ६० ॥
भरताय हनूमंतं दूतं प्रास्थापयत् तदा ॥
लक्षयित्वेंगितं सर्वं प्रियं तस्मै निवेद्य वै ॥ ६१ ॥
वायुपुत्रे पुनः प्राप्ते नंदिग्रामं उपागमत् ।
स तत्र मलदिग्धांगं भरतं चीरवाससं ॥ ६२ ॥
अग्रतः पादुके कृत्वा ददर्शासीनमासने ॥
संगतः भरतेनाथ शत्रुघ्नेन च वीर्यवान् ॥ ६३ ॥
राघवः सहसौमित्रिः मुमुदे भरतर्षभ ॥
ततः भरतशत्रुघ्नौ समेतौ गुरुणा तदा ॥ ६४ ॥
वैदेह्याः दर्शनेनोभौ प्रहर्षं समवापतुः ॥
तस्मै तत् भरतः राज्यं आगतायातिसत्कृतं ॥
न्यासं निर्यातयामास युक्तः परमया मुदा ॥ ६५ ॥
ततः तं वैष्णवे शूरं नक्षत्रेऽभिमतेऽहनि ॥
वसिष्ठः वामदेवश्च सहितौ अभ्यषिंचतां ॥ ६६ ॥
सोभिषिक्तः कपिश्रेष्ठं सुग्रीवं ससुहृज्जनं ।
विभीषणं च पौलस्त्यं अन्वजानात् गृहान् प्रति ॥६७॥
अभ्यर्च्य विविधैः भोगैः प्रीतियुक्तौ मुदायुतौ ॥
समाधायेतिकर्तव्यं दुःखेन विससर्ज ह ॥ ६८ ॥

पुष्पकं च विमानं तत् पूजयित्वा स राघवः ॥
प्रादात् वैश्रवणायैव प्रीत्या स रघुनंदनः ॥ ६९ ॥
ततः देवर्षिसहितः सरितं गोमतीं अनु ॥
दशाश्वमेधान् आजह्रे जारूथ्यान् स निरर्गलान् ॥७०॥

॥ इति २९१ अध्यायः ॥

मार्कंडेय ह्मणतात याप्रमाणें रामास पूर्वी संकट प्राप्त झालें होतें त्यांतून त्यानें एकट्यानें आपणांस सोडविलें. त्यास फक्त ऋक्ष व वानरांचें सहाय्य होतें. हे युधिष्ठिरा! तुला भीमार्जुनासारखे शूर भ्राते व इतर राजे सहाय्य असतां तूं कां शोक करतोस. या संकटांतून पार पडून तूं खरोखर राज्यावर बसशील. ( वन. अ. २९२ ).

मार्कं.। एवं एतत् महाबाहो रामेणामिततेजसा ।
प्राप्तं व्यसनमत्युग्रं वनवासकृतं पुरा ॥ १ ॥
असहायेन रामेण वैदेही पुनराहृता ।
हत्वा संख्ये दशग्रीवं राक्षसं भीमविक्रमं ॥ ११ ॥
यस्य शाखामृगा मित्राण्यर्क्षाः कालमुखाः तथा ॥
जात्यंतरगताः राजन् एतत् बुध्यानुचिंतय ॥ १२ ॥

॥ इति २९२ अध्यायः ॥

१३. ज्या राजांनीं शत्रूंचा कपटानें वध केला त्यांत राम होता. वन० ३१५-२०

विष्णुना वसता चापि गृहे दशरथस्य वै ।
दशग्रीवः हतश्छन्नं संयुगे भीमकर्मणा ॥

१४. शस्त्र धारण करणारांमध्यें मी राम आहें असें कृष्ण अर्जुनास सांगतात. भीष्म. ३४-३१.

पवनः पवतां अस्मि रामः शस्त्रभृतामहं ॥

१५. राम जसे सीतेसह रममाण झाले तसा दिवोदास राजा माधवीसह रमता झाला. उद्योग. अ. १०७

रेमे स तस्यां राजर्षिः प्रभावत्यां यथा रविः ॥ ७ ॥
वैदेह्यां च यथा रामः रुक्मिण्यां च जनार्दनः ॥१७।

१६. शिखंडी रामासारखा अस्त्रवेत्ता आहे असें भीम ह्मणतो. उद्योग. अ. १५१-३०

यस्य संग्राममध्ये तु दिव्यं अस्त्रं प्रकुर्वतः ।
रूपं द्रक्ष्यंति पुरुषाः रामस्येव महात्मनः ॥

१७. अस्त्रविद्येंत कृष्ण रामाच्या तोडीचे होते. द्रो. १०

वृष्णीनां प्रवरं वीरं शूरं सर्वधनुष्मतां ॥ ३७ ॥
रामेण सममस्त्रेषु यशसा विक्रमेण च ॥४१॥

१८. धर्मराजास अभिमन्यूचे वधाचें दुःख झालें तेव्हां याच्यापेक्षांही मोठमोठे राजे मरण पावले आहेत, तूं खेद करूं नकोस अशी नारदांनीं त्याची समजूत केली, व पूर्वी संजयास सांगितलेल्या १६ राजांच्या

कथा सांगितल्या. यांतच रामाची कथा आली आहे. राम आपल्या प्रजेचें पुत्राप्रमाणें पालन करीत असे, त्याचे राज्यांत सर्व लोक निरोगी व सुखी होते व अकालीं कोणी मरत नसत. रामांनीं अश्वमेधादि यज्ञ करून देवांस संतुष्ट केलें व राक्षसांचा नाश करून ऋषींची भीति दूर केली. सरतेशेवटीं आठ ठिकाणीं आपल्या वंशजांचें राज्य स्थापून व चारी वर्णांचे लोक बरोबर घेऊन राम स्वर्गास गेले. द्रोण. अ. ५९.

नारदः । रामं दाशरथिं चैव मृतं संजय शुश्रुम ।
यं प्रजां अन्वमोदंत पिता पुत्रान् इवौरसान् ॥ १ ॥
असंख्येयाः गुणाः यस्मिन् आसन् अमिततेजसि ।
यः चतुर्दश वर्षाणि निदेशात् पितुरच्युतः ।
वने वनितया सार्धं अवसत् लक्ष्मणाग्रजः ॥ २ ॥
जघान च जनस्थाने राक्षसान् मनुजर्षभ ।
तपस्विनां रक्षणार्थं सहस्राणि चतुर्दश ॥ ३ ॥
तत्रैव वसतः तस्य रावणः नाम राक्षसः ।
जहार भार्यां वैदेहीं संमोह्यैनं सहानुजं ॥ ४ ॥
तं आगस्कारिणं रामः पौलस्त्यं अजितं परैः ।
जघान समरे क्रुद्धः पुरेव त्र्यंबकोंधकं ॥ ५ ॥
सुरासुरैः अवध्यं तं देवब्राह्मणकंटकं ।

जघान स महाबाहुः पौलस्त्यं सगणं रणे ॥ ६ ॥
स प्रजानुग्रहं कृत्वा त्रिदशैः अभिपूजितः ।
व्याप्य कृत्स्नं जगत् कीर्त्या सुरर्षिगणसेवितः ॥ ७॥
स प्राप्य विविधं राज्यं सर्वभूतानुकंपकः ।
आजहार महायज्ञं प्रजाः धर्मेण पालयन् ॥ ८ ॥
निरर्गलं सजारुथ्यं अश्वमेधं च तं विभुः ।
आजहार सुरेशस्य हविषा मुदमाहरत् ॥ ९ ॥
यु. १२८-९४ । अन्यैश्च विविधैः यज्ञैः ईजे बहुगुणैः नृपः ।
क्षुत्पिपासेऽजयत् रामः सर्वरोगांश्च देहिनां ॥ १० ॥
सततं गुणसंपन्नः दीप्यमानः स्वतेजसा ।
अतिसर्वाणि भूतानि रामः दाशरथिः बभौ ॥ ११ ॥
ऋषीणां देवतानां च मानुषाणां च सर्वशः ।
यु. १२८-९८ । पृथिव्यां सहवासोऽभूत् रामे राज्यं प्रशासति ।
नाह्रीयत तदा प्राणः प्राणिनां न तदन्यथा ।
प्राणोपानः समानश्च रामे राज्यं प्रशासति ॥ १३ ॥
पर्यदीप्यंत तेजांसि तदाऽनर्थाश्च नाभवन् ।
दीर्घायुषः प्रजाः सर्वाः युवा न म्रियते तदा ॥ १४॥
वेदैः चतुर्भिः सुप्रीताः प्राप्नुवंति दिवौकसः ।
हव्यं कव्यं च विविधं निष्पूर्तं हुतमेव च ॥ १५ ॥
अदंशमशकाः देशाः नष्टव्यालसरीसृपाः ।

नाप्सु प्राणभृतां मृत्युः नाकाले ज्वलनोदहत् ॥१६॥
अधर्मरुचयः लुब्धाः मूर्खा वा नाभवन् तदा ।
शिष्टेष्टप्राज्ञकर्माणः सर्वे वर्णाः तदाऽभवन् ॥ १७ ॥
स्वधां पूजां च रक्षोभिः जनस्थाने प्रणाशितं ।
प्रादात् निहत्य रक्षांसि पितृदेवेभ्य ईश्वरः ॥ १८ ॥
सहस्रपुत्राः पुरुषाः दशवर्षशतायुषाः ।
न च ज्येष्ठाः कनिष्ठेभ्यः तदा श्राद्धान्यकारयन्॥१९॥
श्यामः युवा लोहिताक्षः मत्तमातंगविक्रमः ।
आजानुबाहुः सुभुजः सिंहस्कंधः महाबलः ॥ २० ॥
दशवर्षसहस्राणि दशवर्षशतानि च।
सर्वभूतमनःकांतः रामः राज्यं अकारयत् ॥ २१ ॥
रामः रामः राम इति प्रजानां अभवत् कथा ।
रामात् रामं जगदभूत् रामे राज्यं प्रशासति ॥ २• ॥
चतुर्विधाः प्रजाः रामः स्वर्गं नीत्वा दिवं गतः ।
आत्मानं संप्रतिष्ठाप्य राजवंशं इहाष्टधा ॥ २८ ॥
॥ इति ५९ अध्यायः ॥

१९. अलायुध व घटोत्कचाचें युद्ध रामरावणासारखें झालें. द्रोण. अ. ९६-२८.

तयोः युद्धं महाराज चित्ररूपं इवाभवत् ।
यादृशं हि पुरा वृत्तं रामरावणयोः मृधे ॥

२०. सात्यकी रामासारखा अस्त्रांत प्रवीण होता. द्रोण. अ. ९८ (४१-४२).

एतत् अस्त्रबलं रामे कार्तवीर्ये धनंजये ।
भीष्मे च पुरुषव्याघ्रे यदिदं सात्वतां वरे ।।

२१. भीमाचे व आर्षशृंगी राक्षसाचें युद्ध रामरावणासारखें झालें. द्रोण. १०६-१७.

तयोः समभवत् युद्धं नरराक्षसयोः मृधे ।
यादृगेव पुरा वृत्तं रामरावणयोः नृप ।।

२२. खरास मारून जसा राम शोभला तसा निरमित्रास मारून सहदेव शोभला. द्रोण. अ. १०७-२८

तं तु हत्वा महाबाहुः सहदेवः व्यरोचत ।
यथा दाशरथी रामः खरं हत्वा महाबलं ।।

२३. अलंबुष व घटोत्कचाचें युद्ध रामरावणासारखें झालें. द्रोण. अ. १०९ (३-४).

तयोर्युद्धं समभवत् रक्षोग्रामणिमुख्ययोः ।
यादृक् एव वृत्तं रामरावणयोः प्रभो ।।

२४. रामासारखे पराक्रमी नागदत्तादि धृतराष्ट्रपुत्र भीमावर धांवले. द्रोण. अ. १५७-१७.

पुत्राः तेऽभ्यर्दयन् भीमं दश दाशरथेः समाः ।।

२५. एकलव्य रामासारखा पराक्रमी होता असें कृष्ण ह्मणतात. द्रोण. अ. १८१-१८.

**स तु बद्धांगुलित्राणः नैषादिः दृढविक्रमः ।**
**अतिमानी वनचरः बभौ राम इवापरः ॥**

२६. अश्वत्थामा रामासारखा सर्व विद्यांत निष्णात होता. द्रोण. अ. १९४ (८-१२).

**रामस्य तु समः शस्त्रे पुरंदरसमः युधि ॥**
**वेदस्नातः व्रतस्नातः धनुर्वेदे च पारगः ।**
**महोदधिरिवाक्षोभ्यः रामः दाशरथिः यथा ॥**

२७. रामांनीं जसा रावणास मारला तसा अर्जुनानें कर्णास मारला. कर्ण. अ. ५ (५४-५७).

**महेंद्रेण यथा वृत्रः यथा रामेण रावणः ।**
**तथार्जुनेन स हतः द्वैरथे युद्धदुर्मदः ॥**

२८. अस्त्रविद्येंत रामासारखा प्रवीण जो कर्ण त्यास तूं कसें मारलेंस असें धर्म अर्जुनास विचारतात. कर्ण. ६६.

**शक्रतुल्यबलः युद्धे यमतुल्यः पराक्रमे ।**
**रामतुल्यः तथास्त्रेण स कथं वै निषूदितः ॥२४॥**

२९. कर्णार्जुन रामासारखे पराक्रमी होते. कर्ण.८६-२६.

**कार्तवीर्यसमौ चोभौ तथा दाशरथेः समौ ॥**

३०. युद्ध समाप्तीनंतर कुलनाशानें धर्मराजास फार

शोक झाला, ह्मणून ज्या १६ राजांच्या कथा त्यास सांगण्यांत आल्या आहेत त्यांत रामाची कथा आहे. यांतही रामराज्यांत वेळचे वेळीं पाऊस पडे, रोगराई नव्हती, तंटेबखेडे होत नसत, लोक फार सुखी असून त्यांचें राम पोटच्या पोराप्रमाणें पालन करीत असें वर्णन आहे. शांति. २९(५१-६२).

**रामं दाशरथिं चैव मृतं संजय शुश्रुम ।**
**योन्वकंपत वै नित्यं प्रजाः पुत्रान् इवौरसान् ॥ ५१॥**
**विधवा यस्य विषये नानाथाः काश्चनाभवन् ।**
**सदैवासीत् पितृसमः रामः राज्यं यदन्वशात् ॥ ५२॥**
**कालवर्षी च पर्जन्यः सस्यानि समपादयत् ।**
नित्यं सुभिक्षमेवासीत् रामे राज्यं प्रशासति ॥ ५३ ॥
वा. १-९२। प्राणिनः नाप्सु मज्जंति नान्यथा पावकोऽदहत्।
रुजा भयं न तत्रासीत् रामे राज्यं प्रशासति ॥ ५४ ॥
आसन् वर्षसहस्रिण्यः तथा वर्षसहस्रकाः ।
अरोगाः सर्वसिद्धार्थाः रामे राज्यं प्रशासति ॥ ५५ ॥
नान्योन्येन विवादोऽभूत् स्त्रीणामपि कुतः नृणां ।
धर्मनित्याः प्रजाः चासन् रामे राज्यं प्रशासति ॥५६॥
संतुष्टाः सर्वसिद्धार्थाः निर्भयाः स्वैरचारिणः ।
नराः सत्यव्रताः चासन् रामे राज्यं प्रशासति ॥ ५७॥

नित्यपुष्पफलाश्चैव पादपाः निरुपद्रवाः ।
सर्वाः द्रोणदुघाः गावः रामे राज्यं प्रशासति ॥ ९८ ॥
स चतुर्दश वर्षाणि वने प्रोष्य महातपाः ।
यु. १२८-९९। दशाश्वमेधान् जारूथ्यान् आजहार निरर्गलान्
युवा श्यामः लोहिताक्षः मातंग इव यूथपः ।
आजानुबाहुः सुमुखः सिंहस्कंधः महाभुजः ॥ ६० ॥
यु. १२८-१०४ । दशवर्षसहस्राणि दशवर्षशतानि च ।
अयोध्याधिपतिः भूत्वा रामः राज्यं अकारयत् ॥ ६१ ॥
॥ इति २९ अध्यायः ॥

३१. एका ब्राह्मणाचा पुत्र मेला तेव्हां त्याचें प्रेत स्मशानांत टाकून जात असतां एका गृध्राचा व कोल्ह्याचा संवाद झाला. त्या वेळीं कोल्हा ह्मणाला कीं ईश्वराची कृपा झाली तर मेलेला प्राणी जिवंत होतो, व यास एका ब्राम्हण पुत्रास शंबूक नांवाच्या शूद्रास मारून रामानीं उठविलें असें त्यानें उदाहरण दिलें. शांति. १५३.

श्रूयते शंबुके शूद्रे हते ब्राह्मणदारकः ।
जीवितः धर्ममासाद्य रामात् सत्यपराक्रमात् ॥६७॥

३२. विष्णूच्या स्तुती करणारांत रामाचें नांव आढळतें. शांति. २९२-१५.

कक्षिवान् जामदग्न्यः च रामः तांड्यः तथात्मवान् ॥

३३. आदिनारायण आपले भविष्यावतार कथन करतांना त्यांत रामावताराची कथा सांगतात, व अवतारी वानरांच्या सहाय्यानें मी रावणाचा वध करीन असें ह्मणतात. येथील दहा अवतारांत बुद्धाचें नांव नाहीं ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. शांति. ३१९.

संध्यांशे समनुप्राप्ते त्रेतायाः द्वापरस्य च ।
अहं दाशरथी रामः भविष्यामि जगत्पतिः ॥ ८५ ॥
त्रितोपघातात् वैरूप्यं एकतोऽथ द्वितस्तथा ।
प्राप्स्यते वानरत्वं हि प्रजापतिसुतौ ऋषी ॥ ८६ ॥
तयोः येत्वन्वये जाताः भविष्यंति वनौकसः ।
महाबलाः महावीर्याः शक्रतुल्यपराक्रमाः ॥ ८७ ॥
ते सहाय्याः भविष्यंति सुरकार्ये मम द्विज ।
ततः रक्षःपतिं घोरं पुलस्त्यकुलपांसनं ॥ ८८ ॥
हनिष्ये रावणं रौद्रं सगणं लोककंटकं ॥ ८९ ॥

३४. क्रोधाचे दोषवर्णनांत रावणाचा रामानें नाश केल्याचें सांगितलें आहे. शांति. ३६०-१५.

रोषस्य हि वशं गत्वा दशग्रीवः प्रतापवान् ।
तथा शक्रप्रतिस्पर्धी हतः रामेण संयुगे ॥

३५. गोप्रदानाचें माहात्म्य दशरथानें रामास सांगितलें. अनुशासनपर्व ७४-११.

इंद्रः दशरथाश्चाह रामश्चाह पिता तथा ।

३६. गोप्रदानानें जे राजे उत्तम लोकीं गेले त्यांत राम होते. अनुशासन. ७६-२६.

तथा वीरः दाशरथिश्च रामः ॥

३७. यज्ञांत दानानें उत्तम लोकीं जे राजे गेले त्यांत राम होते. अनुशासन. १३७-१४.

रामः दाशरथिः चैव हुत्वा यज्ञेषु वै वसु ।
स गतः ह्यक्षयान् लोकान् यस्य लोके महत् यशः ॥

३८. विष्णुसहस्रनामांत रामाचें नांव आहे. अनुशासन. १४९-५६.

रामः विरामः विरजः मार्गः नेयः नयोऽनयः ॥

३९. ज्यांच्या कीर्तनानें पापक्षालन होतें त्यांत राम आहे. अनुशासन. १३५-५१.

रामः राक्षसहा वीरः शशबिंदुः भगीरथः।

४०. अश्वमेध केल्यानें ज्ञातिवधाचें पातक जात असें व्यासांनीं धर्मास सांगून, रामाचें उदाहरण दिलें आहे. अश्वमेधिकपर्व ३-९.

यजस्व वाजिमेधेन विधिवत् दक्षिणावता ।
बहुकामान्नवित्तेन रामः दाशरथिः यथा ॥

आतांपर्यंत रामकथेचे भारतांतील जे चाळीस उतारे आले आहेत त्यांत बारावा उतारा अत्यंत महत्वाचा आहे. यास तिसाव्या पानापासून सुरवात होऊन तो ११९ वे पानावर संपला आहे. यांत रामायणांत न आढळणाऱ्या अशा बऱ्याच कथा आहेत, परंतु या विषयाशीं संबंध नसल्यामुळें मीं त्यांचा विचार केला नाहीं. रामायणांत रामानीं कुंभकर्णास मारलें असून भारतांत त्यास लक्ष्मणाकडून मारविलें आहे, व हाच कायतो दोन्हीं कथाभागांत अत्यंत महत्वाचा विरोध आहे. संस्कृत न जाणणाऱ्या वाचकांकरतां यांतील प्रत्येक अध्यायाचे वर त्या त्या अध्यायाचा मराठींत गोषवारा दिला आहे, व थोडें संस्कृत येणारांस यांतील श्लोकांचा अर्थ सहज कळावा ह्मणून छंदोभंग होऊं न देतां संधी तोडले आहेत. यांत जे श्लोक बारीक अक्षरांनीं छापले आहेत ते रामायणांत व भारतांत सारखे आहेत, व अशा श्लोकांच्या आरंभीं दिलेले आंकड्यांकडे पाहिलें असतां व्यासांनीं या रामोपाख्यानांत रामायणाच्या सर्व कांडांतील श्लोक उतरून घेतले आहेत असें वाचकांचे लक्षांत येईल. याचे खालोखाल अकरा, अठरा व तीस हे तीन उतारे

असून त्यांतही रामचरित्रांतील बऱ्याच गोष्टी आल्या आहेत. बाकीचे उतारे दृष्टांताकरतां भारतांत आलेले आहेत. पांच, अकरा, बारा, एकतीस व चाळीस या उताऱ्यांतील कथा उत्तरकांडांत आल्या आहेत, त्यावरून उत्तरकांड भारताचे वेळीं होतें यांत संशय नाहीं. उत्तरकांडांत पुष्कळ कथा अशा आहेत कीं त्यांचा रामायणाशीं फारसा संबंध नाहीं, व मागील ६ कांडांची त्याच्याशीं तुलना केली असतां हें मागून झालेलें असावें असें वाटतें. असें जरी असलें तरी भारताचे वेळीं समग्र रामायण तयार झालें होतें एवढेंच नव्हे तर राम ज्या स्थानीं राहिले होते त्यांस तीर्थत्व प्राप्त झालें होतें हें सहा, सात व आठ या उताऱ्यांवरून दिसून येईल. ऋग्वेदाचे दहाव्या मंडलांत रामाचें नांव आहे ह्मणून रामासंबंधीं बोलतांना 'पुरा' हा शब्द भारतात वापरला आहे. 'राम' याचा अर्थ जेथें परशुराम किंवा बलराम होतो तेवढीं स्थलें सोडून बाकीच्या ठिकाणीं 'राम' याचा श्री दाशरथी राम असा अर्थ घेतला आहे.

# रामायणांतील इतर कथा.

१. घटोत्कच कुंतीस ह्मणतो कीं मी रावण व इंद्रजित यांसारखा पराक्रमी आहें:-आदि. १५५ (४४-४५)

यथा हि रावणः लोके इंद्रजिच्च महाबलः।
वर्ष्मवीर्यसमः लोके विशिष्टश्चाभवं नृषु ॥

२. यमसभेंत रामलक्ष्मण राहतात. सभा. ८-१८.

रामः दाशरथिश्चैव लक्ष्मणोऽथ प्रतर्दनः ॥

३. वरुणसभेंत रावण व वाली राहतात. सभा. ९-१४.

दशग्रीवश्च वाली च मेघवासा दशावरः ॥

४. दक्षिण दिशा जिंकण्यास सहदेव गेला तेव्हां त्यानें बिभीषणाकडे दूत पाठवून करभार आणविला. सभा. ३१ (७३-७४). या पर्वांत रामकपर्वत (अ. ३१) व रामठराजे (अ. ३२) असे दोन उल्लेख रामासंबंधीं असावेत असें मला वाटतें.

ततः कच्छगतः धीमान् दूतान् माद्रवतीसुतः।
प्रेषयामास राजेंद्र पौलस्त्याय महात्मने ॥
विभीषणाय धर्मात्मा प्रीतिपूर्वं अरिंदमः।
स चास्य प्रतिजग्राह शासनं प्रीतिपूर्वकं ॥
तच्च कालकृतं धीमान् अभयमन्यत स प्रभुः ॥

५. भीमाचें व किर्मीर राक्षसाचें वृक्षयुद्ध वाली-सुग्रीवाप्रमाणें झालें. वन. ११ (४७-४८).

तत् वृक्षयुद्धं अभवत् महीरुहविनाशनं ।
वालिसुग्रीवयोः भ्रात्रोः यथा स्त्रीकांक्षिणोः पुरा ॥

६. कुंभकर्णाश्रमांत गेले असतां मनुष्यास प्रतिष्ठा मिळते. वन ८४-५७.

कुंभकर्णाश्रमं गत्वा पूज्यते भुवि मानवः ॥

७. गौतम वनांत अहिल्याकूपांत स्नान केलें तर उत्तम गति प्राप्त होते. वन. ८४-१०९.

अहल्यायाः ह्रदे स्नात्वा व्रजेत परमां गतिं ।

८. जनकराजाच्या कूपांत स्नान केलें ह्मणजे वैकुंठास जातो. वन. ८४-१११.

जनकस्य तु राजर्षेः कूपः त्रिदशपूजितः ।
तत्राभिषेकं कृत्वा तु विष्णुलोकं अवाप्नुयात् ॥

९. जटासुर व भीमाचें युद्ध वालीसुग्रीवासारखें झालें. वन. १५७-६०.

तत् वृक्षयुद्धं अभवत् महीरुहविनाशनं ।
वालिसुग्रीवयोः भ्रात्रोः पुरा स्त्रीकांक्षिणोः यथा॥

१०. धुंधू राक्षस कुंभकर्णासारखा उठला व त्यास कुवलाश्वानें मारिलें. वन. २०-२९.

तं प्रबुद्धं महात्मानं कुंभकर्णं इवापरं।
आससाद महातेजा कुवलाश्वः महीपतिः ॥

११. संकटकालीं ज्या स्त्रियांनीं पतीचा त्याग केला नाहीं त्यांत सीतेचें नांव आहे. विराट. २१ (१२-१३).

दुहिता जनकस्यापि वैदेही यदि ते श्रुता ।
पतिं अन्वचरत् सीता महारण्यनिवासिनं ॥
रक्षसा निग्रहं प्राप्य रामस्य महिषी प्रिया ।
क्लिश्यमानापि सुश्रेणी रामं एवान्वपद्यत ॥

१२. भीमाचें व कीचकाचें युद्ध वालीसुग्रीवांसारखें झालें. विराट. २२ ( ५३-५५ ).

बाहुयुद्धं तयोराशीत् क्रुद्धयोः नरसिंहयोः ।
वालिसुग्रीवयोः भ्रात्रोः पुरेव कपिसिंहयोः ॥

१३. मारुती अर्जुनाचे ध्वजावर होता असे सर्व भारतांत शेंकडों उल्लेख आहेत, त्यांपैकीं फक्त दोन देतों. यांतलि पहिला चरण कूट श्लोकाचा असून त्यांत लंका, रावण, अशोकवन व त्याचा मारुतीनें केलेला नाश यांचें वर्णन कवीनें मोठ्या चातुर्यानें गोविलें आहे.

नदीज लंकेशवनारिकेतुः ॥ विराट. ३९-१०
भीमसेनानुरोधाय हनुमान् मारुतात्मजः ।
आत्मप्रतिकृतिं तस्मिन् ध्वजे आरोपयिष्यति॥ ५६-९

१४. रामाचे वंशांतील २९ वा राजा बृहद्वल* हा भारती युद्धांत कौरवांस मिळाला. हा मोठा पराक्रमी असून सहदेवानें याचा अयोध्येंत पराभव करून करभार आणिला व शिशुपालानें राजसूय यज्ञांत याची स्तुती केली. हा रथी होता व व्यूहप्रसंगीं महत्वाच्या जागीं याची योजना करीत. हा अयोध्येचा राजा असून यास कौसल्य असें विशेषण वारंवार देण्यांत येतें; यास अभिमन्यूनें मारिलें. सभा, अध्याय ( ३०, ३४, ४४ ),उद्योग. (४, ५७, १६०, १६६ ), भीष्म. ( १६, ४५, ४७, ४९, ५६, ८१, ८७, ९२, ९४, १००, १०८, ११४, ११५, ११६ ), द्रोण. ( ३७, ३९, ४६, ४७, ७३ ), शल्य. (२, ४, ७३ ), स्त्री. २५.

१५. घटोत्कचाचे घोडे रावणाच्या घोड्यांसारखे वाटेल तिकडे जात असत. द्रोण. अ. २३-९०.

---

* राम-कुश-अतिथि-निषध-नभ-पुंडरीक-क्षेमधन्वा—देवानीक-अनीह--पारियात्र-बलस्थल—वज्रनाभ—खगण—विधृति-हिरण्यनाभ-पुष्य-ध्रुवसंधी-सुदर्शन-अग्निवर्ण-शीघ्र—मरु-प्रसुश्रुत-संधि—अमर्षण-महस्वान-विश्वसाह-प्रसेनजित्—तक्षक-बृहद्वल-भागवत. स्कंध ९ अध्याय १२.

घटोत्कचस्य राजेंद्र ध्वजे गृध्रः व्यरोचत ।
अश्वाश्च कामगाः तस्य रावणस्य पुरा यथा ॥

१६. शल्याचे ध्वजस्थानीं सुवर्णाची सीता होती. द्रोण. अ. १०५ ( १८-२० ).

मद्रराजस्य शल्यस्य ध्वजाग्रेऽग्निशिखां इव ।
सौवर्णीं प्रतिपश्याम सीतां अप्रतिमां शुभां ॥

१७. अलंबुष व भीमाचें युद्ध लक्ष्मण व इंद्रजितासारखें झालें. द्रोण अ. १०८-१३.

अलंबुषस्तु समरे भीमसेनं महाबलं ।
योधयामास संक्रुद्धः लक्ष्मणं रावणि यथा ॥

१८. दक्षिण दिशेचें महात्म्य गालवास सांगतांना गरुड ह्मणतो कीं येथें तप करून रावणानें देवांपासून अवध्यत्व मिळविलें. उद्योग. १०९-१२.

अत्र राक्षसराजेन पौलस्त्येन महात्मना ।
रावणेन तपः चीर्त्वा सुरेभ्योऽमरता वृता ॥

१९. भीमानें कर्णावर फेंकण्याकरितां हत्ती उचलिला त्यावेळीं गंधमादनपर्वत आणणाऱ्या मारुतीसारखा तो शोभला. द्रोण. अ. १३९ ( ८५-८६ ).

उद्यम्य कुंजरं पार्थः तस्थौ परपुरंजयः ।
महौषधिसमायुक्तं हनूमानिव पर्वतं ॥

२०. इंद्रजिताला मारून लक्ष्मणानें जसा रामास आनंद दिला तसा तुला मारून आज मी कौरवांस दे-ईन असें भूरिश्रवा सात्यकीस ह्मणतो. द्रोण. १४२-१०.

अद्य संयमनीं याता मया त्वं निहतः रेण ।
यथा रामानुजेनाजौ रावणिः लक्ष्मणेन ह ॥

२१. घटोत्कच ह्मणतो मी रावणासारखा पराक्रमी आहें. द्रोण. १५६-९८.

रक्षसां अधिराजोहं दशग्रीवसमः बले ।

२२. अलायुध व घटोत्कचाचें युद्ध वालीसुग्रीवांचे युद्धासारखें झालें. द्रोण. १७८ ( २७-२८).

युद्धं समभवत् घोरं भैम्यलायुधयोः नृप ।
हरींद्रयोः यथा राजन् वालिसुग्रीवयोः पुरा ॥

२३. रावणासारखे पराक्रमी जे बक, हिडिंब व किर्मीर राक्षस ते भीमाकडून धर्मराजाचे हितार्थ कृष्णांनीं मार-विले. द्रोण.१८१ (२३-२४).

हिडिंब-बक-किर्मीराः भीमसेनेन पातिताः ।
रावणेन समप्राणाः ब्रह्मयज्ञविनाशिनः ॥

२४. वालीचा पराङ्मुख वध केल्यानें जशी रामाची अपकीर्ति झाली तशी द्रोणास प्रायोपवेशनप्रसंगीं

मारविल्यामुळें तुझी होईल असें अर्जुन धर्मास ह्मणतो. द्रोण. १९६ ( ३५-३६ ).

चिरं स्थास्यति चाकीर्तिः त्रैलोक्ये सचराचरे ।
रामे वालिवधात् यद्वत् एवं द्रोणे निपातिते ॥

२५. रामानें जसा रावणास मारला तसा अर्जुनानें कर्णास मारला. कर्ण. ५-( ५४-५८ ).

महेंद्रेण यथा वृत्रः यथा रामेण रावणः ।
तथार्जुनेन स हतः द्वैरथे युद्धदुर्मदः॥
सामात्यबांधवः राजन् कर्णः प्रहरतां वरः ॥

२६. कर्णभीमाचें युद्ध वालीसुग्रीवांसारखें झालें. कर्ण. ५१-( ३४-३५ ).

ततः युद्धं अभूत् घोरं कर्णपांडवयोः मृधे ।
हरींद्रयोः इव मुहुः परस्परवधैषिणोः ॥

२७. पूर्वी शत्रूंस ज्यांनीं कपटानें मारलें त्यांत राम होते असें कृष्ण भीमास दुर्योधनाचे वधप्रसंगीं सांगतात. शल्य. ३१ ( ११-१२ ).

यथा पौलस्त्यतनयः रावणः नाम राक्षसः ।
रामेण निहतः राजन् सानुबंधः सहानुगः ।
क्रियया योगमास्थाय तथा त्वमपि विक्रम ॥

वर जे सत्तावीस उतारे दिले आहेत त्यांपैकीं चौदावा फार महत्वाचा आहे. रामापासून २९ वा पुरुष जर भारती युद्धांत लढण्यास येतो तर भारतकालीं रामास होऊन गेल्यास पुष्कळ वर्षें झालीं हें सिद्ध करण्यास दुसऱ्या पुराव्यांची वास्तविक काय गरज आहे? यांतील बाकीचे उतारे बहुतेक दृष्टांताकरतां भारतांत आलेले आहेत, त्यांत वालीसुग्रीव यांचे युद्धाचा दृष्टांत पुष्कळ वेळ आला आहे. वालीचा पराङ्मुख वध केल्यानें रामाची झालेली अपकीर्ती भारत कालींही कमी झाली नव्हती. पांच व पंधरा यांत रामायणांतील कथांचा उल्लेख करतानां 'पुरा' (ह्मणजे पुरातन कालीं झालेला) हा शब्द वापरलेला आहे. या उताऱ्यांत रामायणाच्या सर्व कांडांतील कथा आल्या आहेत.

# रामायणाविरुद्ध आढळणाऱ्या कथा.

१. भृगुतीर्थाचें वर्णन करतांना लोमश युधिष्ठिरास सांगतात कीं यांत स्नान करून परशुरामाचें रामांनीं हरण केलेलें तेज त्यास पुन्हां प्राप्त झालें. रावणास मारण्याकरतां दशरथाचे पोटीं विष्णू जन्मास आले हें ऐकून परशुराम अयोध्येस आले, तेव्हां दशरथानें रामास सामोरा पाठविला. रामास पाहून परशुराम ह्मणाले हें माझें धनुष्य सज्ज करून त्यास बाण लाव. तेव्हां रामांनीं तें धनुष्य सज्ज करून त्यास बाण लावला व ह्मणाले मी तुला दिव्यदृष्टी देतों ह्मणजे मी कोण आहे तें तुला समजेल. परशुरामास दिव्यदृष्टी मिळाल्याबरोबर रामाचे शरीरांत सर्व चराचर विश्व त्याचे दृष्टीस पडलें. मग रामांनीं तो बाण सोडून परशुरामाचें तेज हरण केलें. तेव्हां एक वर्षभर परशुराम लपून राहिला. याचें त्याच्या पितरांस वाईट वाटून त्यांनीं त्यास या तीर्थांत स्नान करण्यास सांगितलें त्याप्रमाणें त्यानें केल्यावर नष्ट झालेलें तेज फिरून त्यास प्राप्त झालें. ( वन. अ. ९९ ).

लोमशः । जातः दशरथस्यासीत् पुत्रः रामः महात्मना
विष्णुः स्वेन शरीरेण रावणस्य वधाय वै ॥
पश्यामः तं अयोध्यायां जातं दाशरथिं ततः ॥४१॥
ऋचीकनंदनः रामः भार्गवः रेणुकासुतः ॥
तस्य दाशरथेः श्रुत्वा रामस्याक्लिष्टकर्मणः ॥ ४२ ॥
कौतूहलान्वितः रामः अयोध्यां अगमत् पुनः ॥
धनुरादाय तत् दिव्यं क्षत्रियाणां निबर्हणं ॥ ४३ ॥
जिज्ञासमानः रामस्य वीर्यं दाशरथेः तदा ।
तं वै दशरथः श्रुत्वा विषयांतं उपागतं ॥ ४४ ॥
प्रेषयामास रामस्य रामं पुत्रं पुरस्कृतं ॥
स तं अभ्यागतं दृष्ट्वा उद्यतास्त्रं अवस्थितं ॥ ४५ ॥
प्रहसन्निव कौंतेय रामः वचनमब्रवीत् ॥
कृतकालं हि राजेंद्र धनुः एतत् मया विभो ॥ ४६ ॥
समारोपय यत्नेन यदि शक्नोषि पार्थिव ॥
इत्युक्तः त्वाह भगवन् त्वं नाधिक्षेप्तुमर्हसि ॥ ४७ ॥
नाहं अप्यधमः धर्मे क्षत्रियाणां द्विजातिषु ॥
इक्ष्वाकूणां विशेषेण बाहुवीर्ये न कत्थनं ॥ ४८ ॥
तमेवं वादिनं तत्र रामः वचनमब्रवीत् ॥
वैअलं व्यपदेशेन धनुः आयच्छ राघव ॥ ४९ ॥
ततः जग्राह रोषेण क्षत्रियर्षभसूदनं ॥

रामः दाशरथिर्दिव्यं हस्तात् रामस्य कार्मुकं ॥५०॥
धनुः आरोपयामास सलील इव भारत ॥
ज्याशब्दं अकरोत् चैव स्मयमानः स वीर्यवान्॥५१
तस्य शब्दस्य भूतानि वित्रसंत्यशनेरिव ॥
अथाब्रवीत् तदा रामः रामं दाशरथिः तदा ॥५२॥
इदं आरोपितं ब्रह्मन् किमन्यत् करवाणि ते ॥
तस्य राजः ददौ दिव्यं जामदग्न्यः महात्मनः॥
शरं आकर्णदेशांतं अयं आकृष्यतां इति ॥ ५३ ॥
लोम०।एतत् श्रुत्वाब्रवीत् रामःप्रदीप्त इव मन्युना॥
श्रूयते क्षम्यते चैव दर्पपूर्णोऽसि भार्गव ॥ ५४ ॥
त्वया ह्यधिगतं तेजः क्षत्रियेभ्यः विशेषतः ॥
पितामहप्रसादेन तेन मां क्षिपसि ध्रुवं ॥ ५५ ॥
पश्य मां स्वेन रूपेण चक्षुस्ते वितराम्यहं ॥
ततः रामशरीरे वै रामः पश्यति भार्गवः ॥ ५६ ॥
आदित्यान् सवसून् रुद्रान् साध्यांश्च समरुद्गणान् ॥
पितरः हुताशनः चैव नक्षत्राणि ग्रहाः तथा ॥५७॥
गंधर्वाः राक्षसाः यक्षाः नद्यः तीर्थानि यानि च ॥
ऋषयः वालखिल्याश्च ब्रह्मभूताः सनातनाः ॥ ५८ ॥
देवर्षयः च कार्त्स्न्येन समुद्राः पर्वतास्तथा ॥
वेदाश्च सोपनिषदः वषट्कारैः सहाध्वरैः ॥ ५९ ॥

वेतोमंति च सामानि धनुर्वेदश्च भारत ॥
मेघवृंदानि वर्षाणि वियुतश्च युधिष्ठिर ॥ ६० ॥
ततः स भगवान् विष्णुः तं वै बाणं मुमोच ह ।
शुष्काशनिसमाकीर्णं महोल्काभिश्च भारत ॥६१॥
पांसुवर्षेण महता मेघवर्षैश्च भूतले ॥
भूमिकंपैश्च निर्घातैः नादैश्च विपुलैरपि ॥ ६२ ॥
स रामं विव्हलं कृत्वा तेजश्चाक्षिप्य केवलं ॥
आगच्छत् ज्वलितः बाणः रामबाहुप्रचोदितः॥६३॥
स तु विव्हलतां गत्वा प्रतिलभ्य च चेतनां ॥
रामः प्रत्यागतप्राणः प्राणमत् विष्णुतेजसं ॥ ६४ ॥
विष्णुना सोभ्यनुज्ञातः महेंद्रं अगमत् पुनः ॥
भीतस्तु तत्र न्यवसत् व्रीडितस्तु महातपाः ॥ ६५ ॥
ततः संवत्सरेतीते हृतौजसमवस्थितं ॥
निर्मदं दुःखितं दृष्ट्वा पितरः राममब्रुवन् ॥ ६६ ॥
पितरः। नैव सम्यक् इदं पुत्र विष्णुं आसाद्य वै कृतं॥
स हि पूज्यश्च मान्यश्च त्रिषु लोकेषु सर्वदा ॥६७॥
गच्छ पुत्र नदीं पुण्यां वधूसरकृताव्हयां ॥
तत्रोपस्पृश्य तीर्थेषु पुनः वपुरवाप्स्यसि ॥ ६८ ॥
दीप्तोदं नाम तत्तीर्थं यत्र ते प्रपितामहः ॥
भृगुः देवयुगे राम तप्तवान् उत्तमं तपः ॥ ६९ ॥

तत्तथा कृतवान् रामः कौंतेय वचनात् पितुः ॥
प्रामवान् च पुनस्तेजः तीर्थेऽस्मिन् पांडुनंदन ॥७०॥
॥ इति ९९ अध्यायः ॥

२. पूर्वी दंडकारण्यांत राम राक्षसांचा वध करीत असतां एका राक्षसाचें शिर तुटलें तें महोदर ऋषीच्या मांडीस चिकटलें. तें सोडविण्याचा त्यानें पुष्कळ प्रयत्न केला, परंतु त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. शेवटीं ऋषींच्या सांगण्यावरून त्यानें सरस्वतींतील औशनस तीर्थी स्नान केलें, तेव्हां तें शिर मांडीपासून सुटून पाण्यांत बुडालें, व तेव्हांपासून त्या तीर्थास कपालमोचन असें नांव पडलें. शल्य. ३९ (४-२३).

वैशंपा.। पुरा वै दंडकारण्ये राघवेण महात्मना।
वसता राजशार्दूल राक्षसान् शमयिष्यता ॥ ९ ॥
जनस्थाने शिरश्छिन्नं राक्षसस्य दुरात्मनः ।
क्षुरेण शितधारेण उत्पपात महावने ॥ १० ॥
महोदरस्य तल्लग्नं जंघायां वै यदृच्छया ।
वने विचरतः राजन् अस्थि भित्वाऽस्फुरत् तदा॥११॥
स तेन लग्नेन तदा द्विजातिः न शशाक ह ।
अभिगंतुं महाप्राज्ञ तीर्थान्यायतनानि च ॥ १२ ॥
स पूतिना विस्रवता वेदनार्तः महामुनिः ।

जगाम सर्वतीर्थानि पृथिव्यां चेति नः श्रुतं ॥१३॥
स गत्वा सरितः सर्वाः समुद्रांश्च महातपाः ।
कथयामास तत् सर्वं ऋषीणां भावितात्मनां ॥१४॥
आप्लुत्य सर्वतीर्थेषु न च मोक्षं अवाप्तवान् ।
स तु शुश्राव विप्रेंद्र मुनीनां वचनं महत् ॥ १५ ॥
सरस्वत्याः तीर्थवरं ख्यातं औशनसं तदा ।
सर्वपापप्रशमनं सिद्धिक्षेत्रं अनुत्तमं ॥ १६ ॥
स तु गत्वा ततः तत्र तीर्थं औशनसं द्विजः ।
ततः औशनसे तीर्थे तस्योपस्पृशतः तदा ।
तत् शिरः चरणं मुक्त्वा पपातांतर्जले तदा ॥ १७ ॥
विमुक्तः तेन शिरसा परं सुखमवाप ह ।
स चाप्यंतर्जले मूर्धा जगामादर्शनं विभो ॥ १८ ॥
ततः स विशिरा राजन् पूतात्मा वीतकल्मषः ।
आजगामाश्रमं प्रीतः कृतकृत्यः महोदरः ॥ १९ ॥
सोऽथ गत्वाश्रमं पुण्यं विप्रमुक्तः महातपाः ।
कथयामास तत् सर्वं ऋषीणां भावितात्मनां ॥२०॥
ते श्रुत्वा वचनं तस्य ततः तीर्थस्य मानद ।
कपालमोचनमिति नाम चक्रुः समागताः ॥ २१ ॥

॥ इति ३९ अध्यायः ॥

# वाल्मीकीचे नांवाचे उल्लेख.

१. जनमेजयाची स्तुति करतांना आस्तिक ह्मणतो कीं वाल्मीकिसारखें तुझें वीर्य आहे. आदि. ५५-१४.

वाल्मीकिवत्ते निभृतं स्ववीर्यं ।

वसिष्ठवत्ते नियतश्च कोपः ॥

२. इंद्रसभेंतील ऋषींत वाल्मीकीचें नांव आहे. सभा. ७-१६. कलकत्ताप्रत.

सहदेवः सुनीथश्च वाल्मीकिश्च महातपाः ॥

३. शृंगवेरतीर्थीं राहणाऱ्या ऋषींत प्रथम वाल्मीकीचें नांव असून पुढें वसिष्ठविश्वामित्रांचीं नांवें आलीं आहेत. वन. (११९-१२९).

ऋषिमुख्याः सदा यत्र वाल्मीकिस्त्वथ कश्यपः।

आत्रेयः कुंडजठरः विश्वामित्रोऽथ गौतमः ।

भरद्वाजः वसिष्ठश्च मुनिः उद्दालकस्तथा ॥

४. कृष्ण शिष्टाईस जात असतां वाटेंत ज्या ऋषींनीं त्यांस प्रदक्षिणा केली त्यांत वाल्मीकीचें नांव आहे, व येथेंच वसिष्ठविश्वामित्रांचीं नांवें आहेत. उद्यो. ८३-२७.

वसिष्ठः वामदेवश्च भूरिद्युम्नः गयः क्रथः ।

शुकनारदवाल्मीकाः मरुतः कुशिकः भृगुः ॥

५. भीष्माजवळ जे ऋषि आले त्यांत वसिष्ठ, विश्वामित्र व वाल्मीकि यांचीं नांवें आहेत. शांति. ४७(७-८).

असितेन वसिष्ठेन कौशिकेन महात्मना ।
सनत्कुमारः कपिलः वाल्मीकिः तुंबरुः कुरुः ॥

वरच्या उताऱ्यांपैकीं १, ४ व ५ मध्यें वसिष्ठविश्वामित्राबरोबर वाल्मीकिचें नांव आल्यामुळें, रामाचा समकालीन व रामायणाचा कर्ता जो वाल्मीकि तोच हा असें धरण्यास कांहीं हरकत नाहीं. हरिवंशांत वाल्मीकीचें नांव दोन ठिकाणीं आलें आहे. पहिला श्लोक भारत महात्म्यांतील असून त्यांत व्यास व वाल्मीकीचीं वचनें प्रमाणभूत आहेत असें वर्णन आहे व दुसऱ्यांत वाल्मीकीची वाणी ही दुर्गेचा अंश आहे असें सांगितलें आहेः-

यत् वाजपेयेन तु राजसूयात् ।
दृष्टं फलं हस्तिरथेन चान्यत् ॥
तल्लभ्यते, व्यासवचः प्रमाणं ।
गीतंच वाल्मीकिमहर्षिणा च ॥ १-६
सरस्वती च वाल्मीके स्मृतिः । द्वैपायने तथा ॥५८-१७

# रामायण ग्रंथाचे उल्लेख.

१. अनुक्रमणिकाध्यायांत वनपर्वांत जीं आख्यानें आहेत त्यांत रामायण हें उपाख्यान दिलें आहे.

**रामायणं उपाख्यानं अत्रैव बहुविस्तरं ।**
**यत्र रामेण विक्रम्य निहतः रावणायुधिः ॥**

गंधमादन पर्वतावर भीमाची व मारुतीची गांठ पडली असतां रामायणांत हनुमानाचें फार वर्णन आहे असें भीम ह्मणतो.

**रामायणेऽतिविख्यातः श्रीमान् वानरपुंगवः ॥**

या उताऱ्यांपैकीं वनपर्वांतील उतारा अत्यंत महत्वाचा आहे; हा पांडवांचे कथाभागांत आल्यामुळें भारतांतील नाहीं असें कोणत्याही प्रकारें ह्मणतां यावयाचें नाहीं. अनुक्रमणिकाध्याय भारतांत मागाहून जोडलेला आहे असें कांहीं ह्मणतात, ह्मणून मीं पहिले उताऱ्यास महत्व दिलें नाहीं. या उताऱ्यावरून भारतकालीं रामायण ग्रंथ तयार होता असें सिद्ध होतें.

# सारखे श्लोक.

भारत ग्रंथ रोज चार पांच तास वाचला तर तो संपण्यास नऊ महिने व रामायणास तीन महिने लागतात; ह्मणून त्यांतील श्लोक लक्षांत ठेवण्यासारखी माझी धारणाशक्ति नाहीं. हे ग्रंथ वाचतांना जीं टिपणें मीं करून ठेविलीं होतीं त्यांवरून रामायणांतील जे श्लोक भारतांत येतात ते मीं काढले आहेत. यापेक्षां पुष्कळ अधिक श्लोक कुशाग्र बुद्धीच्या माणसांस सांपडतील. भारत व रामायणाचे सर्व प्रतींची अनुक्रमणिका करणें फारच मेहनतीचें काम आहे, तें जेव्हां कोणी करील तेव्हां दोहोंत सारखे श्लोक किती आहेत हें तेव्हांच कळून येईल.

भरत रामास भेटण्यास गेला असतां रामानें त्यास जे कुशल प्रश्न केले आहेत त्यांपैकीं बरेच राजसूययज्ञाचे प्रसंगीं नारदांनीं धर्मास केले आहेत. या ठिकाणीं पुष्कळ श्लोक एकसारखे असून कांहींत थोडा फरक आहे. बालकांडांतील व आश्वमेधिक पर्वांतील अश्वमेधाचे वर्णनांतही कांहीं सारखे श्लोक आहेत. या दोन स्थलांशिवाय इतर ठिकाणचे श्लोक कथानुसंधानानें आले आहेत.

पुन्नाम्नः नरकात् यस्मात् पितरं त्रायते सुतः।
तस्मात् पुत्र इति प्रोक्तः पितॄन् यः पाति सर्वतः।
अयोध्या. १०७-१२. आदि. २२९-१४.

योनिदेशाच्च यवनान् शकृतः शबरान् बहून् ॥
बा. ५५ ३. आदि १७५-३६.

कच्चित् अर्थेन वा धर्मं धर्मेणार्थं अथापि वा।
६२ ॥ उभौ वा प्रीतिसारेण न कामेन प्रबाधसे ॥ १९ ॥
कच्चित् अर्थंच धर्मंच कामंच जयतांवर।
६३ ॥ विभज्य काले कालज्ञः सदा वरद सेवसे ॥ २० ॥
कच्चित् आत्मसमाः वृद्धाः शुद्धाः संबोधनक्षमाः।
१५ ॥ कुलीनाः चानुरक्ताश्च कृतास्ते वीर मंत्रिणः ॥ २६ ॥
१६ ॥ विजयः मंत्रमूलः हि राज्ञां भवति भारत ॥ २७ ॥
कच्चित् निद्रावशं नैषि कच्चित् काले विबुध्यसे।
१७ ॥ कच्चित् चापररात्रेषु चिंतयस्यर्थमर्थवित् ॥ २९॥
कच्चिन्मंत्रयसे नैकः कच्चिन्न बहुभिः सह।
१८॥ कच्चित्ते मंत्रितः मंत्रः राष्ट्रं न परिधावति ॥ ३० ॥
कच्चित् अर्थान् विनिश्चित्य लघुमूलान् महोदयान्।
१९ ॥ क्षिप्रं आरभसे कर्तुं न विघ्नयसि तादृशान् ॥ ३१ ॥
कच्चित् सहस्रैर्मूर्खाणां एकं क्रीणासि पंडितम्।
२२ ॥ पंडितः ह्यर्थकृच्छ्रेषु कुर्यान्निश्रेयसं परम् ॥ ३५ ॥

कच्चित् दुर्गाणि सर्वाणि धनधान्यायुधोदकैः ।
५३ यंत्रैश्च प्रतिपूर्णानि तथा शिल्पिधनुर्धरैः ॥ ३६ ॥
एकोऽप्यमात्यः मेधावी शूरः दांतः विचक्षणः ।
२४ ॥ राजानं राजपुत्रं वा प्रापयेत्महतीं श्रियम् ॥ ३७ ॥
कच्चिदष्टादशान्येषु स्वपक्षे दशपंच च ।
३६ ॥ त्रिभिः त्रिभिः अविज्ञातैः वेत्सि तीर्थानि चारकैः॥३८॥
कच्चित् विनयसंपन्नः कुलपुत्रः बहुश्रुतः ।
११ ॥ अनसूयुः अनुप्रष्टा सत्कृतः ते पुरोहितः ॥ ४० ॥
कच्चित् अग्निषु ते युक्तः विधिज्ञः मतिमान् ऋजुः ।
१२ ॥ हुतं च होष्यमाणं च काले वेदयते सदा ॥ ४१ ॥
कच्चित् मुख्याः महत्स्वेव मध्यमेषु च मध्यमाः ।
२५ ॥ जघन्याश्च जघन्येषु भृत्याः कर्मसु योजिताः ॥ ४२ ॥
अमात्यान् उपधातीतान् पितृपैतामहान् शुचीन् ।
२६ ॥ श्रेष्ठान् श्रेष्ठेषु कच्चित्त्वं नियोजयसि कर्मसु ॥ ४३ ॥
कच्चित् नोग्रेण दंडेन भृशं उद्विजसे प्रजाः ।
२७ ॥ राष्ट्रं तवानुशासंति मंत्रिणः भरतर्षभ ॥ ४४ ॥
कच्चित्त्वां नावजानंति याजकाः पतितं यथा ।
२८ ॥ उग्रप्रतिग्रहीतारं कामयान इव स्त्रियः ॥ ४५ ॥
कच्चित् धृष्टश्च शूरश्च धृतिमान् मतिमान् शुचिः ।
३० ॥ कुलीनः चानुरक्तश्च दक्षः सेनापतिः तथा ॥ १८ ॥

कच्चित् बलस्य ते मुख्याः सर्वे युद्धविशारदाः ।
३१ ॥ धृष्टावदाताः विक्रांताः त्वया सत्कृत्य मानिताः ॥४७
कच्चित् बलस्य भक्तं च वेतनं च यथोचितं ।
३२ ॥ संप्राप्तकाले दातव्यं ददासि न विकर्षसि ॥ ४८
कालातिक्रमणात् एते भक्तवेतनयोः भृताः ।
३३ ॥ भर्तुः कुर्वंति दौर्गत्यात् सोनर्थः सुमहान् स्मृतः ॥४९॥
कच्चित् सर्वेऽनुरक्तास्त्वां कुलपुत्राः प्रधानतः ।
३४ ॥ कच्चित् प्राणान् तवार्थेषु संत्यजंति सदा युधि ॥५०॥
कच्चित् स्त्रियः सान्त्वयसि कच्चित् ताश्च सुरक्षिताः ।
४९ ॥ कच्चिन्न श्रद्दधास्यासां कच्चित् गुह्यं न भाषसे ॥ ८३
कच्चित् ज्ञातीन् गुरून् वृद्धान् दैवतान् तापसान् अपि
६१ ॥ चैत्यांश्च वृक्षान् कल्याणान् ब्राह्मणांश्च नमस्यसि ॥१००
कच्चित् आर्यः विशुद्धात्मा क्षारितः चौरकर्मणि ॥
५६ ॥ अदृष्टशास्त्रकुशलैः न लोभात् वध्यते शुचिः ॥ १०४
दुष्टः गृहीतः तत्कारी तज्ज्ञैः दृष्टः सकारणः ।
५७ ॥ कच्चिन्न मुच्यते स्तेनः द्रव्यलोभात् नरर्षभ ॥ १०५
उत्पन्नान् कच्चिदाढ्यस्य दरिद्रस्य च भारत ।
५८ ॥अर्थान्न मिथ्या पश्यंति तवामात्याः हृताः जनैः ॥१०६
नास्तिक्यमनृतं क्रोधं प्रमादं दीर्घसूत्रताम् ।
६५ ॥ अदर्शनं ज्ञानवतां आलस्यं पंचवृत्तिताम् ॥ १०७ ॥

एकाचिंतनमर्थानां अनर्थज्ञैश्च चिंतनम् ।

६६ ॥ निश्चितानां अनारंभं मन्त्रस्यापरिरक्षणम् ॥ १०८ ॥

मंगलाद्यप्रयोगं च प्रत्युत्थानं च सर्वतः ।

६७ ॥ कच्चित्त्वं वर्जयस्येतान् राजदोषान् चतुर्दश ॥ १०९

सुलभाः पुरुषाः राजन् सततं प्रियवादिनः ।

अप्रियस्य तु पथ्यस्य वक्ता श्रोता च दुर्लभः ॥

अर. ३७-२, यु. १६-२१. सभा ६४-१६, उद्यो. ३७-१५

भर्ता नाम परं नार्याः शोभनं भूषणादपि ।

एषा हि रहिता तेन शोभनार्हा न शोभते ॥

सुंदर. १६-२६ वन. ६८-१९.

गुरोरप्यवलिप्तस्य कार्याकार्यमजानतः । २८

उत्पथं प्रतिपन्नस्य कार्यं भवति शासनम् ॥

अयो. २१-१३. आदि. १४-५४, उद्योग. १७८-४८,

परस्परं भक्षयंतः मत्स्या इव जले कृशान् ॥

अयो. ६७-३१. शा. ६७-१७

पंचपंचनखाः भक्ष्याः ब्रह्मक्षत्रस्य वै विशः ।

कि. १७-३९. शां. १४१-७०

मितं ददाति हि पिता मितं भ्राता मितं सुतः ।

अमितस्य हि दातारं भर्तारं का न पूजयेत् ॥

अयोध्या. ३९-३०. शां. १४८.६

संस्तरे कुशलाश्चापि सर्वकार्याणि याजकाः ।

बा. स. १४-३१. अश्व ८८-३४.

२० ॥ दिवसे दिवसे चक्रुः यथाशास्त्रानुदर्शनात् ॥ ३५ ॥

ततः यूपोच्छ्रये प्राप्ते षड्बैल्वान् भरतर्षभ ।

२१ ॥ खादिरान् बिल्वसमितान् तावतः सर्ववर्णिनः ॥२७॥

३१ ॥ ऋषभाः शास्त्रपठिताः तथा जलचराश्च ये ॥ ३४ ॥

यूपेषु नियता चासीत् पशूनां त्रिशती तथा ।

३२ ॥ अश्वरत्नोत्तरा यज्ञे कौंतेयस्य महात्मनः ॥ ३५ ॥

शिष्टान्यंगानि यान्यासन् तस्याश्वस्य नराधिप ।

३८ ॥ तान्यग्नौ जुहुवुः धीराः समस्ताः षोडशर्त्विजः ॥ ५

पितॄन् दश तु मातैका सर्वां वा पृथिवीं अपि ।

गुरुत्वेनाति भवति नास्ति मातृसमः गुरुः ॥

गो. अयो. २२ ( १२-१३ ) शांति १०८ (१७-१८)

जातस्य हि ध्रुवः मृत्युः ध्रुवं जन्म मृतस्य च ।

तस्मात् अपरिहार्येर्थे नत्वं शोचितुमर्हसि ॥

गो. अयो. ८४--२१ गीता. २--२७

वरील श्लोकांपैकीं ठळक अक्षरांनीं छापलेला भाग रामायणांत व भारतांत एकसारखा आहे, त्यावरून वाचकांचे असें लक्षांत येईल कीं रामायणांतून प्रसंगविशेषीं व्यासांनीं वरींच अवतरणें घेतलीं आहेत. अर्ध्या चरणा-

पेक्षां कमी सारखे असे दोन्ही ग्रंथांत बरेच श्लोक आहेत पण ते मीं येथें दिले नाहींत. ज्या श्लोकांत शब्दसादृश्य नसून फक्त अर्थसादृश्य आहे असे रामायणांत व भारतांत शेंकडों श्लोक आहेत, परंतु त्यांचा मी मुळींच विचार केला नाहीं; कारण एकाच गोष्टीचें दोन कवी वर्णन करूं लागले तर त्यांत अर्थसादृश्य येणें साहजिक आहे व अशा सादृश्यावरून एकानें दुसऱ्याचा ग्रंथ पुढें ठेविला होता असें बिलकुल ह्मणतां यावयाचें नाहीं; असो. या मुद्यासंबंधानें फक्त एक दोन गोष्टींचा विचार कर्तव्य आहे. वर जे मीं श्लोक दिले ते रामायणावरून व्यासांनीं घेतले असें ह्मणण्यास पुष्कळ पुरावा आहे. परंतु खालीं जे मी दोन श्लोक देत आहें ते व्यासांनीं रामायणांतून घेतले असें रामायणाच्या सर्व प्रती मजजवळ नसल्यामुळें मला सध्यां खात्रीनें ह्मणवत नाहीं. पतिशुश्रूषेनें स्त्रियांस स्वर्गप्राप्ति होते अशा आशयाचे सीतेचे खालील श्लोक भारतांत आढळतात. अनुशासनपर्व ४६. ( १२-१३ ) वन २०५ ( २२-२३ )

विदेहराजदुहिता चात्र श्लोकं अगायत ॥
नास्ति यज्ञक्रिया कश्चित् न श्राद्धं नोपवासकम् ॥
धर्मः स्वभर्तृशुश्रूषा तया स्वर्गं जयंत्युत ॥

शांतिपर्वांत राजकर्तव्यवर्णनांत 'लोकांनीं प्रथम राजा नेमावा; कारण राजा नसेल तर स्त्री व धन सुरक्षित रहात नाहींत '. अशा अर्थाचा एक वाल्मीकीचा (भार्गव) श्लोक दिला आहे. शांतिपर्व ५७( ४०-४१ ).

**श्लोकश्चायं पुरा गीतः भार्गवेण महात्मना ॥**

**आख्याते रामचरिते नृपतिंप्रति भारत ॥**

**राजानं प्रथमं विंदेत् ततः भार्या ततः धनं ॥**

**राजन्यसति लोकस्य कुतः भार्या कुतः धनं ॥**

याच पर्वांत या अर्थाचे आणखी दोन श्लोक आढळतात.

**न धनार्थः न दारार्थः तेषां येषां अराजकं ॥ ६७-१२**

**न दाराः न च पुत्रः स्यात् न धनं न परिग्रहः ॥**

या श्लोकांशीं साम्य पावणारा खालील श्लोक मुंबई प्रतींत आढळतो. अयो. ६७-११.

**अराजके धनं नास्ति नास्ति भार्याप्यराजके ॥**

गोरिशिओचे प्रतींत याबद्दल खालील पाठ आहे.

**स्वं नास्त्यराजके राष्ट्रे पुंसां, नच परिग्रहः ॥**

या उताऱ्यांत पुष्कळ साम्य आहे तरी तें व्यासांनीं रामायणांतून घेतलें असें मला ह्मणतां येत नाहीं.

# शेवटचा भक्कम पुरावा.

येथपर्यंत या विषयाचें मीं जें सविस्तर विवेचन केलें आहे त्यावरून रामायण भारताचे पूर्वीचें आहे अशी वाचकांची खात्री झालीच असेल. परंतु अझूनही जे वाचक हा सिद्धांत कबूल करण्यास तयार नसतील त्यांस एकच पुरावा देतों. हा इतका भक्कम आहे कीं मागिल सर्व प्रमाणें आढळलीं नसतीं तरी यावरून **भारत ग्रंथ रामायणानंतरचाच** आहे हें निर्विवाद सिद्ध झालें असतें. वाल्मीकीचीं जीं दोन अवतरणें भारतांत घेतलीं असावींत असें मला वाटतें त्यांचा मी वर विचार केला आहे; परंतु त्याहून अत्यंत महत्वाचें, सर्व प्रतींत आढळणारें, व ऐन युद्धाचे वेळचें असें खालील अवतरण आहे. त्यावरून सर्व शंकांचें निरसन होऊन माझ्या ह्मणण्याची सत्यता प्रत्येकाचे लक्षांत येईल.

युद्धप्रसंगीं सात्यकीस जमिनीवर पाडून त्याचा भूरिश्रवा शिरच्छेद करणार, इतक्यांत कृष्णाचे सांगण्यावरून अर्जुनानें भूरिश्रव्याचा उजवा हात तोडला. हें अधर्मयुद्ध पाहून भूरिश्रव्यास फार वाईट वाटलें व तो बाण-

शय्येवर प्रायोपवेशनार्थ बसला. अशा प्रसंगीं सात्यकीनें त्याचा शिरच्छेद केला, ह्मणून कौरवांकडील योद्ध्यांनीं त्याची निंदा केली. ती ऐकून सात्यकीनें उत्तर दिलें कीं, जेव्हां अभिमन्यूस तुह्मी अधर्मानें मारलें तेव्हां ही तुमची धर्मबुद्धि कोठें गेली होती? संधी मिळेल तेव्हां शत्रूचा घात करावा असें वाल्मीकिचें रामायणांत वचन आहे.

अपिचायं पुरा गीतः श्लोक वाल्मिकिना भुवि
**न हंतव्याः स्त्रिय इति यत् ब्रवीषि प्लवंगम ॥**
सर्वकालं मनुष्येण व्यवसायवता सदा ।
**पीडाकरं अमित्राणां यत् स्यात् कर्तव्यमेव तत् ॥**
द्रोण. १४३ ( ६७-६८ )

स्त्रीवधाचा प्रसंग रामायणांत ताटकावधाचेच वेळीं आहे इतर ठिकाणीं नाहीं, असें वाटून हा श्लोक रामायणांतील नाहीं असें वेबरनें म्हटलें आहे, व हा वाल्मीकी रामायणाचा कर्ता नसून तो तैतिरीय प्रातिशाख्य व्याकरणकर्ता किंवा दुसरा कोणी तरी वाल्मीकी असावा असा त्यानें तर्क लढविला आहे. प्रो. याकोबीनीं हा श्लोक युद्धकांडांत आहे येवढेंच ह्मटलें आहे, परंतु दोन्ही ठिकाणच्या श्लोकांतील फरकांचा मुळींच विचार केला नाहीं. रामायणाचें ज्यानें

सूक्ष्म अवलोकन केलें नाहीं त्यास असेंच वाटण्याचा संभव आहे. युद्धप्रसंगीं मायेची सीता करून तिचा इंद्रजित मारुतीसमोर वध करूं लागला, तेव्हां मारुती इंद्रजितास स्त्रीवध करूं नको असें ह्मणाला, तें ऐकून इंद्रजित म्हणतो युद्ध.( ८१-८८ ).

**न हंतव्याः स्त्रियः चेति यत् ब्रवीषि प्लवंगम ।**
**पीडाकरं अमित्राणां यत् च कर्तव्यमेव तत् ॥**

यावरून असें दिसून येईल कीं भारतांतील श्लोकांपैकीं तिसरा चरण रामायणांत आढळत नाहीं; दुसऱ्या व चौथ्या चरणांत फारच थोडा फरक असून तो भारतांत बहुतेक जशाचा तसा आला आहे. रामायण काव्य असल्यामुळें त्यास लावलेलें ‘ गीत ’ हें विशेषण व तें झाल्यास पुष्कळ काल झाला होता ह्मणून येणारा ‘ पुरा ’ हा शब्द, वाल्मीकिचें नांवाचा स्पष्ट उल्लेख, व दोन्ही श्लोकांचें निकट साम्य वगैरे गोष्टींकडे लक्ष दिलें असतां व्यासांनीं हा वाल्मीकीचा स्पष्ट उतारा घेतला आहे असें कोण ह्मणणार नाहीं ?

# उपसंहार.

वास्तविक या विषयाचें इतकें सविस्तर विवेचन करण्याची गरज नव्हती. परंतु पाश्चात्य पंडितांचीं वचनें वेदतुल्य मानून त्यावर इमारती रचणाऱ्या या देशांतील कांहीं विद्वानांचे खात्री करण्यासाठीं इतका खटाटोप करावा लागला. यापुढें तरी संस्कृतांतील ज्ञानभांडार जगास उघडून दाखविण्याचें कर्तव्य कर्म आमचे आधुनिक विद्वान् करतील व स्वतः सर्व प्रमाणें पाहिल्याशिवाय पाश्चात्य पंडितांचे सिद्धांतास माना डोलविणार नाहींत अशी मला आशा आहे.